# मा णू स

गांधी जन्मशताब्दीचा जल्लोष
देशभर सुरू आहे
नारखेडे बंधूंसारखे निष्ठावंत,
गांधीवादी कार्यकर्ते मरणाच्या
दारात घोटाळत आहेत..........

90

. . . . . .

जळगाव जिल्ह्यात साळवे नावाचे गाव आहे. पारधी गुंडांचा या गावाला नेहमी जाच होई. विहिरी बांधल्या तर बुजवल्या जात. इंजिने, मोटा यांची चोरी ही तर नित्याची बाब. गुंडांची दहशत एवढी की चांगल्या घरच्या आयाबहिणी गुंड उघड काढून नेत, बलात्कार करीत. पण ब्र उच्चारण्याची कुणाची प्राज्ञा नव्हती.

माणूस हा मूलतः चांगलाच असतो ही श्रद्धा मनी बाळगून देवरामभाऊ नारखेडे यांनी एक तपापूर्वी या गावात सुधारणेचे कार्य सुरू केले. वामन आणि अरुण या पाठच्या दोन भावांनीही या कार्यात त्यांना तनमनधनपूर्वक साथ दिली. गाव जागा झाला. गुंडांचा प्रतिकार करावा ही भावना बळावली. एक प्रकरण विकोपाला गेले आणि त्यात सहा पारध्यांचे खून पडले.

सारा गाव आणि देशभरचे गांधीवादी कार्यकर्ते जाणत होते की नारखेडे बंधूंचा या खुनांशी काहीही संबंध नाही. त्यांचा पिंड फक्त सेवकाचा आहे. पण देवराम-वामन यांना फाशी व अरुणला जन्मठेप अशा शिक्षा झाल्या.

काकासाहेब गाडगीळांच्या प्रयत्नांमुळे फाशीची जन्मठेप झाली. आणखी कुणीकुणी प्रयत्न केले आणि देवरामभाऊंची सुटका झाली. सुटकेच्या वेळी देवरामभाऊंना असे आश्वासन दिले गेले की वामन-अरुण यांचीही थोड्या दिवसांत सुटका होईल.

एक वर्ष लोटले. हे आश्वासन अद्याप पुरे झालेले नाही. हे पुरे व्हावे, दिलेला शब्द शासनाने पाळावा यासाठी देवरामभाऊ मुंबईला आणि वामन-अरुण नाशिक तुरुंगात उपोषण करीत आहेत.

ऑगस्ट महिन्यात शिवडीला देवरामभाऊ मला सहज भेटले होते. तुरुंगात असताना त्यांनी केलेले काही लिखाण मी वाचावे, शक्य असेल तर प्रसिद्ध करावे अशी त्यांची इच्छा होती. साळव्याला या, मित्रमंळींना घेऊन या असे त्यांनी आग्रहाचे निमंत्रणही केले.

त्यानंतर त्यांची भेट नाही.

लवकर व्हावी अशी तीव्र इच्छा आहे, आशाही आहे.

**श्री. ग. मा.**

२२ नोव्हेंबर १९६८

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : आठवे : अंक : सत्ताविसावा

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. नोव्हें. १९

आपल्या १६ नोव्हेंबर १९६८ च्या अंकामधली, ‘ महाराष्ट्रातील दुष्काळ व त्यावरील उपाययोजना ’ ह्या पुस्तकाबद्दलची माहिती वाचली आणि तावडतोब वाचनालयात जाऊन मूळ पुस्तक आणले आणि आत्ताच वाचून पुरे केले. अत्यंत महत्त्वाच्या विषयावरचे एक खळबळजनक पुस्तक उजेडात आणल्याबद्दल श्री. दत्त-प्रसाद दाभोलकर ह्यांचे अभिनंदन. शिवाजी प्रति शिवाजीची चर्चा करण्यात आणि पुतळे उभारण्यात दंग असलेल्या आम्हा लोकांना हे पुस्तक कसे दिसणार ! आमचे तज्ज्ञ कृषी महाविद्यालये आणि विद्यापीठे स्थापन करण्यात ‘ बिझी ’ असल्यामुळे त्यांना हे पुस्तक वाचायला वेळ कसा मिळावा ! आणि त्यांनी ते पुस्तक वाचले तरी त्यातले विचार त्यांना “ सोयीचे ” कसे वाटणार ! आणि अमेरिकेसारखे देश आपल्या अन्नधान्याची काळजी वाहत असताना आपण उगाचच त्रास कशाला घ्यायचा ! श्री. दाभोलकरांनी पुस्तक इंग्रजीत लिहिले असते तर, आपल्याला धान्यपुरवठा करणाऱ्या देशांना तरी त्या पुस्तकाचा उपयोग झाला असता. आमच्यापुढे ही गीता वाचणे व्यर्थ होय.

**शशिकांत मांदुस्कर**, मुंबई

मूल्य ४० पैसे

४१९ नारायण

पुणे २

दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ‘ माणूस ’ साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

नेमेचि येते–

# लोकसभा अधिवेशन

भारतीय लोकसभेचं अधिवेशन नेहमीप्रमाणे विरोधी पक्षियांनी आणलेल्या अविश्वासाच्या ठरावाने सुरू झाले. लोकसभेचं असो किंवा विधानसभेचं असो विरोधी पक्षांनी प्रस्थापित सरकारविरोधी आणलेल्या ठरावाशिवाय ते अधिवेशन होऊच शकत नाही, अशी कल्पना होण्याइतकं, ह्या अविश्वास ठरावांचं प्रस्थ हल्ली माजलंय. सरकार काँग्रेसी असो, द्र.मु.क. असो किंवा आघाडी असो, लोकसभा–विधानसभा अधिवेशनांतले काही अमूल्य तास हा ठराव अगदी नियमितपणे खाऊन जातो. ह्या ठरावाच्या चर्चेच्या वेळी सरकारी आणि विरोधी संसदसदस्य एकमेकांच्या उखाळ्या–पाखाळ्या काढून, एकमेकांवर मनसोक्त लाथाळी करून संसदभवनाला एखाद्या मासळीबाजाराचं स्वरूप आणतात. जनतेनं आपल्याला लोकसभेत–विधान-सभेत नेऊन बसवलंय, ते मारामाऱ्या, आरडा–ओरडा करण्यासाठी नव्हे तर, जनतेचे नि पर्यायाने देशाचे असंख्य प्रश्न सोडविण्यासाठी, हा विचारच मुळी ह्या नेत्यांच्या डोक्यांतून ह्या वेळी गायब होतो की काय न कळे! आणि म्हणूनच, परवा १३ नोव्हेंबरला, अविश्वासाच्या ठरावावरील चर्चेच्या वेळी, आरडा–ओरड, गोंधळ माजवून जेव्हा पंतप्रधानांचं भाषण बंद पाडलं गेलं आणि संसदभवनातल्या लोक-प्रतिनिधींच्या अर्वाच्य निदर्शनांचा कळस गाठला गेला, तेव्हा सभापती श्री. संजीव रेड्डींनी संसद सदस्यांच्या सभागृहातील वर्तनाविषयी काही आचारसंहिता असावी असं मत व्यक्तविलं! ह्या मताचं स्वागतच झालं पाहिजे. परंतु निव्वळ अशी आचारसंहिता बनवून काम भागणार नाही, तर जनमताला योग्य असं वळण लावून त्यांना आपल्या प्रतिनिधींवर नियंत्रण ठेवायला मान्यवर अशा नि:पक्ष नेत्यांनी व अन्य समाजधुरिणांनी शिकवलं पाहिजे. मतदारांनी आपण निवडून दिलेल्या प्रति-निधीला सभागृहात त्याने केलेल्या गोंधळाबद्दल, कार्याबद्दल जाब विचारले पाहिजेत. मग त्यासाठी ह्या प्रतिनिधींच्या घरांना ' घेराव ' करावं लागलं तरी हरकत नाही!

अविश्वासाच्या ठरावांतूनही काही घवघवीत यश विरोधकांना मिळतं असंही मुळीच नाही. त्यातून कटुता मात्र वाढते आणि विरोधी पक्ष व सरकार ह्यांतली पोकळी अधिकच वाढून त्यांच्या सहकार्याला मर्यादा पडतात व आवश्यक प्रश्न, त्या प्रश्नांवरील चर्चा वेशीवर टांगून राहतात! निवडणुकीनंतरही लोकप्रतिनिधींवर जनतेचं नियंत्रण राहिलं तरच, ह्या गोष्टींना काही प्रमाणांत आळा बसेल व सर-कारवरही योग्य दडपण येऊ शकेल.

## बनारस हिंदू विश्वविद्यालय

लोकसभा अधिवेशनाचा तिसरा दिवस गाजवला तो बनारस हिंदू विश्वविद्या-लयाने! वास्तविक गेल्या काही दिवसांत विद्यार्थी चळवळींनी उत्तर प्रदेशात

आणि पंजाबात उग्र स्वरूप धारण केलेलं आहे. अलाहाबाद विद्यापीठ बंदच आहे. गोरखपूरलाही तीच परिस्थिती आहे. अलाहाबादेत पोलीस बंदोबस्तात वर्ग भरवण्याचा प्रयत्न झाला तर वर्गात विद्यार्थ्यांऐवजी पोलिसच प्राध्यापकांना जास्त दिसले. विद्यार्थ्यांतील असंतोषाची कारणं काहीही असली व ती कितीही योग्य असली, तरी एक गोष्ट मात्र निश्चित की, विद्यार्थ्यांतील असंतोषाचा फायदा राजकीय पक्ष आपल्या स्वार्थासाठी उठवत आहेत. गोरखपूर आणि अलाहाबाद येथे एका विशिष्ट विचारसरणीच्या व्यक्तींचाच वरचष्मा होता नि त्यामुळे ती विद्यापीठे बंद झाली. बनारस हिंदू विद्यापीठाबाबत मात्र काहीसा वेगळा प्रकार घडला आहे. एक पक्ष विद्यार्थ्यांना भडकविण्याचा प्रयत्न करीत असून कुलगुरू जोशींवर बदनामीचा भडिमार करीत आहे; तर विद्यार्थ्यांचा दुसरा गट कुलगुरूंच्या बाजूने ठामपणे उभा आहे. आणि ह्याचमुळे, रेक्टर–प्रॉक्टर–कुलगुरू ह्यांच्यावरील हल्ल्यानंतर व गुंडगिरीनंतरसुद्धा बनारस विद्यापीठाचं कामकाज चालू आहे. इतकंच नव्हे तर कुलगुरू जोशींनी विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या असंतोषाची कारणं, विद्यापीठातील शिस्त आदींबाबत चौकशी करण्याची घोषणा केली व कुलगुरूंच्या ह्या कृतीला डॉ. त्रिगुण सेन ह्यांनी सभागृहात पाठिंबा व्यक्तविला ! ही समिती आता नेमली जाईल, ती सूचनाही करील; पण तरीही विद्यार्थ्यांच्या समस्या पूर्णपणे सुटतीलच असं वाटत नाही. विद्यार्थ्यांच्या अराजकामागे राजकीय पक्षांचा हात असतो असं म्हणून विद्यार्थ्यांच्या असंतोषाला दूर सारणं चुकीचं ठरेल. राजकीय पक्षांनी विद्यार्थी चळवळींपासून दूर राहावं हेही तितकंच खरं ! पण तरीही विद्यार्थ्यांमधल्या असंतोषाची योग्य दखल घेऊन तो दूर करण्यासाठी पावलं टाकली गेली पाहिजेतच ! सरकारनंही योग्य ती पावलं उचलून विद्यापीठं, महाविद्यालयं, विद्यार्थी–चळवळी ह्यांपासून राजकीय पक्षांना निष्ठुरपणे दूर ठेवलं पाहिजे. हे घडलं तरच विद्यार्थ्यांचे प्रश्न विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोणातून, राष्ट्रीय हितसंवर्धनाच्या दृष्टिकोणातून सोडवले जातील. एरवी विद्यार्थी चळवळींचा फायदा राजकीय स्वार्थासाठी राबवण्यात घेतला जाईल. उत्तर प्रदेशात मुदतपूर्व निवडणुका जवळ येऊन ठेपल्या असतानाच ह्या चळवळी फोफावल्या, विद्यार्थ्यांची अराजकं वाढली ह्याचा दुसरा काही अर्थच लागू शकत नाही !

## येणार ! येणार ! छोट्या मोटारी येणार !

छोट्या मोटारींच्या निर्मितीच्या आजपर्यंत कित्येक योजना, भिन्न भिन्न व्यक्ती व संस्थांनी सादर केलेल्या आहेत. प्रत्येक योजना सादर झाली, की वृत्तपत्रांतून तीवर दोन–तीन रकाने मजकूर येई, त्यावर चर्चा होई. कुणी आशाळभूत दोन–तीन वर्षांत आपल्या दारात ' बेबी कार ' येणार म्हणून उत्साहित होई, तोच त्याच्या लक्षात येई ' बेबी कार ' योजनेविषयी चर्चा, बातम्या, सारं काही बंद झालं आहे, नि तो निराश होई ! अशा ह्या योजनांच्या वावड्या मधूनं मधूनं उठत; त्याचे आराखडे

कधी दृष्टिपथात येत तर कधी साफ नजरेआड होत, आणि तरीही हा छोटचा मोटारींचा कारखाना कुठे निघावा ह्या विषयी मात्र बरीच चर्चा, काही निदर्शनं, मागण्या वगैरे गोष्टी बऱ्याच झाल्या. अलीकडे अलीकडे ह्या चर्चा, योजनांचे मसुदे वगैरे गोष्टी इतक्या नित्याच्या झाल्या होत्या, तरीदेखील बहुतेकांनी मनाशी ताडलं होतं की, ही चार–सहा हजारवाली कार, बहुधा आपल्या नातवांच्या मुलांनाच चालवायला मिळेल ! परंतु परवाच लोकसभेत अशी एक घोषणा झाली आहे की, त्यामुळे बेबी कारची स्वप्नं उराशी बाळगणाऱ्यांच्या आशा निश्चितच पुन्हा पल्लवित झाल्या असतील ! आता दुसऱ्या–तिसऱ्या कुणी नाही तर खुद्द प्रधानमंत्र्यांचे चिरंजीव श्री. संजीव गांधी ह्यांनी सर्वस्वी देशी मालापासून तयार होऊ शकणाऱ्या सहा हजार रुपये किमतीच्या छोटचा मोटारींच्या उत्पादनाची योजना सादर केली असल्याचं जाहीर झालं आहे. श्री. राजीव गांधींनी इटालियन युवतीशी विवाहबद्ध होऊन काही महिन्यांपूर्वीच प्रसिद्धी मिळवली. आता श्री. संजीव गांधींनी छोटचा मोटारींच्या उत्पादनाच्या प्रश्नाला हात घातला आहे. काहीका असेना, खुद्द पंतप्रधानांच्या चिरंजीवांचे हितसंबंध ह्या प्रश्नात गुंतले असल्याने ह्या प्रश्नाला चालना नक्कीच मिळेल ! आता कारखाना कुठे काढायचा ह्यावर रण माजेल ते वेगळं म्हणा ! ह्या प्रश्नाला चालना मिळतेय ते ठीक; पण एक प्रश्न मनात सहज डोकावून जातो, एक- ोन वर्षांपूर्वी सांगलीच्या कुणी सद्गृहस्थांनी (नाव आठवत नाही) सर्वस्वी देशी मालापासून, चार हजार रुपये किमत राहील अशा मोटारीची योजना सादर केली होती व प्रात्यक्षिकही दाखवायची तयारी केली होती, त्याचं काय झालं ?

## ब्रॅव्हो बक्षीजी, ब्रॅव्हो !

कश्मीरातून शेख अब्दुल्ला, सार्वमत आघाडी इत्यादींच्या बातम्या वरचेवर ऐकू येतात. दिवाळीच्या सुमारास शेखसाहेबांनी श्रीनगरात एक परिषद बोलावून, कश्मिरी युवकांना स्वतंत्र सार्वभौम कश्मीरच्या निर्मितीसाठी लढा उभारण्याचं आवाहन केलं. काही घातपातांच्या बातम्या, जातीय चिथावण्यांची वृत्तं कश्मीरमधून येत असतातच. परवाच कश्मीरात अनेकांना, सरकारविरोधी कट रचल्यावरून अटक केल्याचं वृत्त आहे. ह्या अटक केलेल्यांत आठ कश्मिरी विद्यार्थीही आहेत. ह्या साऱ्या कृत्यांच्या पार्श्वभूमीवर, कश्मीरमधून आलेली एक बातमी निश्चितच सुखावह आहे. भारतीय दृष्टिकोणातून उत्साहजनक आहे. कश्मीरचे भूतपूर्व पंतप्रधान, श्री. बक्षी गुलाम महंमद ह्यांनी आपल्या ' नॅशनल कॉन्फरन्स ' ह्या पक्षासह अखिल भारतीय प्रजासमाजवादी पक्षात प्रवेश केला आहे, हीच ती बातमी ! प्रजासमाजवादी पक्षाच्या रूपाने, तिसरा अखिल भारतीय पक्ष, कश्मीरच्या राजकारणात प्रवेश करीत आहे, ही निश्चितच स्वागतार्ह घटना आहे. कॉंग्रेस, जनसंघ हे ह्यापूर्वीच कश्मिरी राजकारणात उतरले आहेत. कम्युनिस्टांनी नॅशनल

कॉन्फरन्सच्या आडून आपलं राजकारण कश्मिरात चालवायचा उद्योग चालवलेला होता. नॅशनल कॉन्फरन्सच्या प्रजासमाजवादी पक्षामधील विलिनीकरणाने कम्युनिस्टांच्या छुप्या राजकारणाला आता खो मिळेल अशी आशा करू ! कश्मीरच्या राजकारणात जेवढे अधिकाधिक अखिल भारतीय पक्ष शिरकाव करू शकतील तेवढेच कश्मिरी जीवन भारतीय मुख्य प्रवाहाशी अधिकाधिक समरस होऊ शकेल, आणि म्हणूनच ही घटना स्वागतार्ह आहे.

नॅशनल कॉन्फरन्स हा कश्मीरमधला मूळचा बलाढ्य पक्ष ! भारतीय पक्षाच्या खांद्याला खांदा लावून हा पक्ष ब्रिटिशांविरुद्ध स्वातंत्र्ययुद्ध खेळला नि ब्रिटिशांबरोबरच राजघराण्याच्या मक्तेदारीविरुद्धही त्यानं झुंज दिली. शेख अब्दुल्ला, बक्षीजी, मिरकासीम व सध्याचे सादिक हे सारे मूळचे नॅशनल कॉन्फरन्सचेच पुढारी ! अगदी अलीकडे कश्मीरला अन्य राज्यांप्रमाणे दर्जा देण्यात आला व कश्मीरच्या प्रधानमंत्र्यांना राज्याच्या मुख्यमंत्र्याचा दर्जा देण्यात आला. त्याच वेळी सादिकसाहेबांनी, नॅशनल कॉन्फरन्स विसर्जित करून सर्व अनुयायांसह काँग्रेसप्रवेश केला ! श्री. डोग्रा ह्यांच्या नेतृत्वाखालील प्रजापरिषदेनं ह्यापूर्वीच जनसंघाची कश्मीर शाखा म्हणून काम करण्यास सुरुवात केली होती ! परंतु बक्षींना नॅशनल कॉन्फरन्सचे काँग्रेसमधील विलिनीकरण मान्य नव्हते. त्यांनी त्या पक्षाचं पुनरुज्जीवन केलं व १९६७ मध्ये कश्मीरच्या निवडणुका लढविल्या. ते स्वतः त्यांच्या काही अनुयायांसह निवडूनही आले. बक्षींच्या प्रधानमंत्री कारकीर्दीबद्दल बरेच आक्षेप घेतले जातात व ते काही अंशी खरेही होते; परंतु एक गोष्ट निश्चित की, शेख अब्दुल्ला, सार्वमत आघाडी इत्यादींच्या राष्ट्रविरोधी कारवायांना त्यांनी कडवा विरोध केला. कश्मीरचं भारतातलं सामिलीकरण अखेरचं आणि कायमचं आहे, ह्या भूमिकेवरून ते कधीच, त्यांच्या पदच्युतीनंतरदेखील, ढळले नाहीत. कश्मीरचे पहिले पंतप्रधान श्री. मेहेरचंद महाजन ह्यांनीदेखील बक्षींसंबंधी, बक्षी हे संपूर्ण भारतीय राष्ट्रवृत्तीचे होते, हेच विचार व्यक्तविले आहेत. आजही, त्यांची निवड, राष्ट्रीय एकात्मता परिषदेत त्यांना मिळालेलं स्थान ह्या गोष्टी त्यांच्या राष्ट्रीत वृत्तीच्याच द्योतक आहेत. बक्षींची कारकीर्द लाचलुचपत, वशिलेबाजी ह्यांनी बजबजली होती हे खरंही असेल; पण ह्याला कोणतं राज्य सरकार, कोणते मंत्री अपवाद होते व आहेत ? जरा ' मराठा 'कार अत्रे, ' ब्लिट्झ 'कार करंजिया आणि लोकसभा गाजवणारे मधू लिमये ह्यांना विचारा ! त्यांच्याजवळच्या मानगडींच्या जंत्रीत नाव नाही असा काँग्रेस मंत्री, खासदार उभ्या देशात जरी सापडला तरी आश्चर्यच वाटेल. आणि म्हणूनच, बक्षींच्या कारकीर्दीविषयी जरा जपूनच काहूर उठवलं पाहिजे. त्यांनी आज उचललेलं पाऊल, कश्मीरच्या भारतातल्या पक्क्या भावनात्मक सामिलीकरणाच्या दृष्टीनं पडलेलं पुढचं पाऊलच आहे आणि राजकीय सामिलीकरणापेक्षा भावनात्मक सामिलीकरणच कश्मीरचं

भारताबरोबरचं भविष्य कायमचं निगडीत करील ! आणि म्हणूनच म्हणावंसं वाटतं, बक्षीजी, ब्रेव्हो ! आगे बढो ! !

## हवे आहे कृषिविद्यापीठ–जिल्ह्यागणिक

काय असेल ते असो पण घटनाच अशा घडतात की, प्रचंड लढे झाल्याशिवाय, हिंसाचार, घातपात, तोडमोड झाल्याशिवाय, आपली मागणी मान्य होणारच नाही, असा समज जनतेच्या मनात निर्माण होत आहे. संयुक्त महाराष्ट्राने एकशे पाच हुतात्म्यांचे जीव घेतले. बेळगाव-कारवार-गोवाही नैवेद्यासाठी अडून बसले असावेत. गेल्या काही महिन्यांत विदर्भातील कृषिविद्यापीठ आंदोलनातही खाजगी व सरकारी मालमत्तेची अशीच बरीच नासधूस झाली. आणि एवढ्या प्रखर आंदोलनानंतर, प्रचंड नासधुसीनंतर, परवा मुख्यमंत्री श्री. नाईक ह्यांनी घोषणा केली की विदर्भासाठी स्वतंत्र कृषिविद्यापीठ मान्य करण्यात येत आहे. वास्तविक, विदर्भासाठी पृथक् कृषिविद्यापीठाचा तोडगा दोन महिन्यांपूर्वीच जनसंघाने सुचवला होता. त्या वेळी तो अव्यवहार्य म्हणून फेटाळून लावण्यात आला होता. तोच तोडगा आता व्यवहार्य कसा काय ? आता अचानकपणे त्यासाठी आवश्यक पैसा सरकारजवळ कुठून आला ? पण इथे व्यवहार्य-अव्यवहार्य हा प्रश्नच नाही. इथे प्रश्न होता तो विदर्भातील घसरत चाललेल्या काँग्रेसी प्रतिष्ठेचा ! म्हणजे केवळ पक्षीय स्वार्थासाठी, एके काळी अव्यवहार्य वाटलेलं धोरण, जनतेच्या दडपणाखाली, सरकार आज राबवायला तयार झालं आहे. ह्यात कृषि-संवर्धनाची आस्था, राष्ट्रीय स्वावलंबन वगैरे दृष्टिकोण अजिबात नाहीत ! वास्तविक ह्या कृषिविद्यापीठावर आजच्या आणीबाणीच्या परिस्थितीत कोटयवधी रुपये खर्चायची आज मुळातच आवश्यकता नाही. आहेत त्या कृषिमहाविद्यालयांची सर्वांगीण वाढ करून, त्यांचा पुरेपूर फायदा उठवला जातो की नाही एवढं पाहलं तरी फार मोठं कार्य होईल ! पण हे होणार नाही. हवं तर आता, मराठवाड्यात, कोकणात आणखी एक एक कृषिविद्यापीठ प्रस्थापित होईल. कदाचित् उद्या प्रत्येक जिल्हाच कृषिविद्यापीठासाठी हिंसक चळवळी उभारील व सरकारही पक्षाची अब्रू राखण्यासाठी ठिकठिकाणी विद्यापीठं निर्मील. कार्य होईलच हे मात्र सांगणं कठीण !

मुंबईकरांनो सावधान ! लोकसभेच्या निवडीनंतर मुंबईच्या कामगारचळवळीतून जवळजवळ अदृश्य झालेले जॉर्जसाब येत आहेत ' मुंबई-बंद ' च्या योजना घेऊन ! ! जॉर्जसाब, विनंती एवढीच की, येणार असलात तर एकजुटीने या ! नाहीतर आपलं तोंड पूर्वेला, डांग्यांचं पश्चिमेला, एसेमचं उत्तरेला आणि रणदिव्यांचं दक्षिणेला ! वरनं सरकारी दंडुकेशाही आहेच आणि एकीकडून मालकांची झोंडशाही ! मधल्या मध्ये आपण सुटून जाल नेहमीसारखेच, सरकार आहे तिथेच राहील, लोकसभेत आवश्यक सेवांविषयी ठराव पास होईलच नेहमीप्रमाणे आणि ह्या सर्वांमध्ये कामगार आणि मुंबईकर मात्र भरडला जाईल नाहक !

—सु. ल. सोमण

# इंजिनीयरिंग मालाची निर्यात

आताच्या परिस्थितीवरून चौथ्या योजनेचे भवितव्य आपण निर्यात किती वाढवू शकतो त्यावर ठरणार, असे म्हणावयास हरकत नाही. ताग, चहा, कापड ह्या आपल्या निर्यातीच्या प्रमुख वस्तू असल्या तरी येत्या पाच वर्षांत या वस्तूंच्या निर्यातीत फार मोठी वाढ होईल, असे मानण्यास जागा नाही. या वस्तूंच्या बाजारपेठांत किमतींतील फेरबदलांमुळे, प्रत्यक्षात निर्यात वाढली तरी त्यापासूनचे रुपयांत उत्पन्न कमी येते, असे अनुभवास येत आहे. त्यामुळे निर्यातवाढीबाबतच्या फार मोठ्या आशा आपल्या नवीन (नॉन ट्रॅडिशनल) निर्यातीवरच अवलंबून आहेत. अशा निर्यातीमध्ये इंजिनीयरिंग मालाच्या निर्यातीस महत्त्वाचे स्थान आहे. इंजिनीयरिंग मालाची निर्यात गेल्या काही वर्षांत प्रचंड वेगाने वाढत आहे.

१९५६–५७ मध्ये इंजिनीयरिंग मालाची निर्यात केवळ ५ कोटी रु. होती. इंजिनीयरिंग निर्यातवाढ मंडळ या संस्थेच्या अव्याहत प्रयत्नांमुळे १९६७–६८ मध्ये हा आकडा ४२ (बेचाळीस) कोटी रु. वर गेला. १९६८–६९ च्या पहिल्या पाच महिन्यांत इंजिनीयरिंग मालाची निर्यात ३२ कोटी रु. झाली आहे. निर्यातीचे प्रमाण असेच राहिले तर १९६८–६९ मध्ये एकूण ७० कोटी रु. ची निर्यात होईल. चौथ्या योजनेत इंजिनीयरिंग मालाच्या निर्यातीची वार्षिक उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १९६९–७० | ८२ कोटी रु. |
| १९७०–७१ | ११४ ,, ,, |
| १९७१–७२ | १४२ ,, ,, |
| १९७२–७३ | १८६ ,, ,, |
| १९७३–७४ | २१५ ,, ,, |

इंजिनीयरिंग मालाच्या निर्यातीत प्रदेशपरत्वे वर्गवारी पाहिली तर आग्नेय आशिया, पश्चिम आशिया, आफ्रिका, पूर्व युरोप, पश्चिम युरोप, उत्तर अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व इतर प्रदेश अशी क्रमवारी लागते. या बाबतींतही

बरेच फेरबदल होत आहेत. १९६१–६२ साली आग्नेय आशियात निर्यात केलेल्या इंजिनीयरिंग मालाचे या मालाच्या एकूण निर्यातीशी प्रमाण ४४ टक्के होते ते १९६७–६८ साली २५ टक्क्यांवर घसरले. याउलट १९६१–६२ साली आपण पूर्व युरोप, पश्चिम युरोप व ऑस्ट्रेलिया येथे विशेष इंजिनीयरिंग माल पाठवीत नव्हतो, ते प्रमाण आता अनुक्रमे १६ टक्के, ८ टक्के व ५ टक्के झाले आहे. या मालाच्या निर्यातीस नवनवीन प्रदेश मिळत आहेत, ही पुढील यशाच्या दृष्टीने चांगली खूण आहे. आग्नेय आशियातदेखील आपली निर्यात एकूण इंजिनीयरिंग मालाच्या निर्यातीच्या तुलनेनेच कमी झाली आहे. आकडेवारीत पाहिले तर ही निर्यात वाढतच आहे. १९६०–६१ मध्ये आग्नेय आशियात आपण ३·४२ कोटी रु. च्या मालाची निर्यात केली, तर १९६७–६८ मध्ये १०·६० कोटी रु. ची निर्यात केली.

इंजिनीयरिंग मालाच्या निर्यातीच्या स्वरूपात गुणात्मक बदल (क्वालिटेटिव्ह चेंज) झाला आहे, असेही दिसून येते. औद्योगिक यंत्रसामग्री, वाहतुकीची साधने, रेल्वेचे डबे, भारी स्ट्रक्चरल सामान, पुलाचे सामान, क्रेन्स, विजेची उपकरणे व विजेचे पंखे, शिवणयंत्रे, सायकली, लोखंडी फर्निचर, इत्यादी मालाची निर्यात आपण करतो. याशिवाय तांत्रिक साहाय्य, आखणी–जुळणी, बांधणी व यंत्रसामग्रीची देखभाल वगैरेंचे प्रत्यक्ष कामही आपण करतो. औद्योगिकदृष्ट्या विकसित अशा देशांतही आपण वरीलपैकी माल पाठवू शकतो हे विशेष. गेल्या वीस वर्षांच्या प्रदीर्घ औद्योगीकरणामुळे (या औद्योगीकरणाचे काही दुय्यम दुष्परिणाम लक्षात घेऊनही) भारत हा औद्योगिक उत्पादक देश बनला आहे, केवळ प्राथमिक मालाची निर्यात करणारा देश राहिलेला नाही, ही गोष्ट निर्विवाद आहे.

आपल्या इंजिनीयरिंग मालाच्या निर्यातीत फार मोठा वाटा इलेक्ट्रिक केबल्स व वायर्स, मोटारींचे सुटे भाग, पोलादी पाईप्स व टच्यूब्ज, फेरस कास्टिंग्ज, स्ट्रक्चरल फॅब्रिकेशन्स, मशीन टूल्स, रेल्वे वॅगन्स व कोचेस यांचा आहे. १९६९–७० व १९७३–७४ या दोन वर्षांची या मालाची तुलनात्मक निर्यातीची उद्दिष्टे खाली दिली आहेत :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| रेल्वे वॅगन्स व कोचेस | २·०० | कोटी रु. | ८४·०० | कोटी रु. |
| स्टील पाईप्स व टच्यूब्ज | ९·९० | ,, | १३·५० | ,, |
| फेरस कास्टिंग्ज | ४·०० | ,, | १०·०० | ,, |
| स्ट्रक्चरल फॅब्रिकेशन्स | ४·७५ | ,, | ८·५० | ,, |
| औद्योगिक यंत्रसामग्री | ४·६० | ,, | ८·१० | ,, |
| मशीन टूल्स | ३·०० | ,, | ७·५० | ,, |
| इलेक्ट्रिक केबल्स व वायर्स | ८·०० | ,, | १०·०० | ,, |
| इलेक्ट्रॉनिक्स | ३·७५ | ,, | ७·२५ | ,, |

इंजिनीयरिंग मालाच्या निर्यातीबाबत मोठ्या अपेक्षा असल्या तरी याबाबत काही प्रश्नही आहेत. पहिला प्रश्न म्हणजे पूर्व युरोपीय देशांत होणाऱ्या निर्यातीचा. या निर्यातीची किंमत रुपयांत मिळते. परकी चलनांत नव्हे. त्यामुळे ही निर्यात वाढून जर देशातील उद्योगधंद्यांच्या अतिरिक्त उत्पादनशक्तीचा विनियोग होऊ शकला व त्यांचा उत्पादनखर्च कमी झाला तरच या निर्यातीचे समर्थन होऊ शकेल. मात्र देशात उत्पादनशक्ती उपलब्ध नसता वा इतर बाजारपेठांत हा माल खपत असता केवळ सोयीस्कर म्हणून पूर्व युरोपात निर्यात वाढू लागली तर ते आपल्या उद्योगधंद्याच्या अंतिम हिताचे तर नाहीच शिवाय आपला परकीय चलनाचा प्रश्नही अशा निर्यातीने सुटणार नाही.

शिवाय पूर्व युरोपातील या मालाची मागणी निश्चित स्वरूपाची नसते असा आजवरचा अनुभव आहे. त्यामुळे आपल्या इंजिनीयरिंग धंद्यात उत्पादनाचे वेळापत्रक आखणे कठीण होते. त्यामुळे पूर्व युरोपातील मागणीवर फार विसंबून राहणे योग्य नाही. निर्यातीची उद्दिष्टे गाठण्यासारखी असली तरी ते अनेक गोष्टींवर अवलंबून आहे. त्यांपैकी काही गोष्टी अशा—

(१) काही काही देशांत माल पाठविण्यासाठी खास व पुरेशी जहाज-जागा मिळत नाही. कित्येक वेळा मालाच्या किमतीच्या ५० टक्क्यांइतके भाडे जहाजासाठी द्यावे लागते. जहाज-भाडी कमी करणे व अधिक जहाज-जागा उपलब्ध करणे हे उपाय करणे अत्यंत तातडीचे आहे.

(२) इंजिनीयरिंग धंद्याला लागणारा काही कच्चा माल पुरेसा उपलब्ध नाही. शीट्स, प्लेट्स, हॉट रोल्ड स्ट्रिप्स, स्कॅल्प व इतर काही कच्चा माल न मिळाल्यास निर्यात उद्दिष्ट गाठणे अवघड जाईल.

(३) आपणांस गेल्या काही दिवसांत इंजिनीयरिंग क्षेत्रातील फार मोठी कंत्राटे जगभर मिळत आहेत. ही जर वेळेवर व ठरलेल्या अटींनुसार पुरी झाली नाहीत तर फार मोठा तोटा होतो. शिवाय यामुळे भारत हा विश्वासपात्र पुरवठा करणारा देश आहे या प्रतिमेला धक्का बसतो. निर्यातीसाठी सर्वच देशांत चढाओढ सुरू असल्याने अशी कंत्राटे इतर देशांना दिली जाण्याचाही संभव असतो. तेव्हा निर्यातक्षेत्राबाबत उद्योगधंद्यांच्या सर्व गरजा ताबडतोब पुऱ्या झाल्या पाहिजेत. ही सर्वोच्च अग्रक्रमाची बाब मानली गेली पाहिजे. कारभारातील दिरंगाईमुळे उत्पादनात वा प्रत्यक्ष माल-पाठवणीत अडथळा आला तर त्याचे दूरगामी परिणाम होतील.

इंजिनीयरिंग उद्योगक्षेत्र हे भारतीय उद्योगाचे सर्वांत गतिमान व वर्धिष्णु क्षेत्र आहे. चौथ्या योजनेतील उत्पादन व निर्यात उद्दिष्टे ते गाठील, असे आजवरच्या अनुभवांवरून वाटते.

**— चंद्रशेखर मराठे**

# ग्यानबाचे गुऱ्हाळ

## निजलिंगप्पांच्या गप्पागोष्टी

मोठी मोठी, जबाबदार माणसे चमत्कारिक बोलू लागली की, किती विचित्र परिस्थिती निर्माण होते नाही ? तुम्ही-आम्ही एखाद्या वेळेस तसे बोललो तर गोष्ट निराळी. आपल्या बोलण्याला महत्त्व ते काय ? पण मोठ्या लोकांचे तसे नसते. ते काही बोलले तरी लोक गंभीरपणे त्याचा विचार करतात. समाजात खळबळ उडते. एखाद्या वेळेस फार विपरीत गोष्टीही घडून येतात.

तुम्ही म्हणाल, हे आज व्याख्यान कशासाठी चालले आहे? कोण मोठा माणूस असे काही चमत्कारिक बोलला ? तुमचे म्हणणे बरोबर आहे. मूळ मुद्दा सोडून मी हे दुसरेच काही आधी बोलणे बरोबर नाही. मुद्दा असा की, आता आपल्या देशातल्या पाच–सहा राज्यांत फेरनिवडणुकी होणार आहेत की नाहीत ? बहुधा फेब्रुवारीतच त्या होतील. त्या निवडणुकींची पूर्वतयारी सध्या जोरात चालू आहे. पक्षोपक्षांचे उमेदवार निश्चित होऊ लागले आहेत. कॉंग्रेस पक्ष या बाबतीत विशेष काळजीत असावा, हे अगदी साहजिक आहे; कारण प्रत्येक जागेसाठी त्यांचा उमेदवार उभा राहणार. त्या बाबतीत कॉंग्रेसचे पुढारी कोणते धोरण स्वीकारणार, हा खरा प्रश्न. उमेदवाराची निवड कशी करायची? त्याच्या कसोटया कोणत्या ? प्रश्न अतिशय गंभीर. पण कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. निजलिंगप्पा यांनी त्याबाबत आपले भाष्य केले, ते मात्र विनोदी आणि चमत्कारिक. तर्काला न पटणारे. कुठल्याही भारतवासियाच्या मनाला धक्का बसेल असे.

बंगलोरच्या एका कुठल्याशा सत्कार–समारंभात भाषण करताना निजलिंगप्पा म्हणाले की, मुदतपूर्व निवडणुकीतील उमेदवार निवडताना मध्यवर्ती पार्लमेंटरी

बोर्ड उमेदवाराचे चारित्र्य, इतिहास आणि प्रामाणिकपणा या गोष्टी विचारात घेऊनच उमेदवारांची निवड करील. ते पुढे म्हणाले की, उमेदवाराचे शिक्षण, वय किंवा इतर गोष्टी यांना फारसे महत्त्व देण्याचे कारण नाही.

निजलिंगप्पांचे हे उद्‌गार ऐकून सभेत खळबळ माजली की नाही, हे माहीत नाही. नक्कीच खळबळ झाली असेल. प्रत्यक्ष कुणी बोलले नसेल इतकेच. पण ही बातमी जसजशी फैलावत जाईल तसतशी ही खळबळ वाढत जाईल, यात काहीच शंकाच नाही. कदाचित तिला एखाद्या उग्र आंदोलनाचेही स्वरूप प्राप्त होईल. नाही म्हणून कोणी सांगावे ! साधी का गोष्ट आहे ? काँग्रेसचा उमेदवार निवडायचा आणि तोही त्याचे चारित्र्य, इतिहास आणि प्रामाणिकपणा पाहून ? भलतेच काहीतरी ! असले विचित्र निकष लावले तर उमेदवारांची निवड करताना पार्लमेंटरी बोर्डाला किती ताप होईल, याची काही कल्पना आहे काय ? यादीतली ऐंशी टक्के नावे अशाने बाद होतील आणि उरलेले वीस टक्के लोक पार्लमेंटरी बोर्डाचेच चारित्र्य, इतिहास आणि त्याचा प्रामाणिकपणा बाहेर काढतील, हे निजलिंगप्पांच्या लक्षात आले नाही काय ? एखाद्या आख्ख्या जिल्ह्यात काँग्रेसला असा उमेदवार कदाचित मिळणार नाही. मग पार्लमेंटरी बोर्ड काय करणार आहे ? एवढे बरे आहे की, असा उमेदवार मिळाला नाही तर आम्ही ती निवडणूकच लढवणार नाही, ती जागा रिकामी सोडू, असे निजलिंगप्पा म्हणाले नाहीत. तसे ते म्हणून बसले असते म्हणजे मग फारच पंचाईत झाली असती. जिकडे तिकडे हाहा:कार माजला असता आणि बऱ्याचशा ठिकाणी काँग्रेसला निवडणुकीच्या आधीच 'वॉक ओव्हर' द्यावा लागला असता. निजलिंगप्पांनी एवढे अनुसंधान राखले, एवढी गोष्ट त्यातल्या त्यात बरी झाली.




शिक्षण, वय आणि इतर गोष्टी यांचा विचार आम्ही करणार नाही, हे मात्र ते अगदी बरोबर बोलले. काँग्रेसच्या उमेदवाराच्या बाबतीत शिक्षणाची अट ठेवणे, घोक्याचेच आहे. राजकारणाचे शिक्षण त्याला असतेच. शिक्षणसंस्थादेखील त्याने काढलेल्या असतात. फारतर भत्तेबिले घेण्याच्या दृष्टीने सोयीस्कर म्हणून त्याला स्वत:ची सही करता आली म्हणजे पुरे. यापेक्षा अधिक शिक्षणाची गरज आहे काय? जास्त शिक्षण घेतले तर काँग्रेसवाला हा काँग्रेसवालाच राहणार नाही, अशी भीती आहे. त्याच्या डोक्यात नाही नाही ते विचार येण्याचा संभव आहे. देश, धर्म, सार्वजनिक चारित्र्य, राष्ट्रीयत्व, साधन-शुचिता, लोकशाही या शब्दांचे खरे अर्थ त्यांना कळू लागतील आणि मग मोठी पंचाईत होईल. आपण सध्या जे उद्योग करतो आहोत, ते काहीतरी चुकीचे आहेत, असे त्याला वाटू लागेल. सगळी-कडे नुसता गोंधळ उडून जाईल. वयाचीही काही अट नाही, हे छान आहे. हिंदू पुरुषाला जशी लग्नाच्या बाबतीत वयाची अट नसते, तशीच ती राजकारण कर-णाऱ्या माणसालाही नसते. किंबहुना प्रौढ किंवा म्हातारा नवरा संसारात जास्त मुरलेला असतो, तसा राजकारणी माणूसही वयोमानानुसार जास्त मुरतो. काँग्रेसचे पुढारी हे या बाबतीत आदर्श आहेत. तरुण रक्ताच्या माणसाच्या हाती ते काही सोपवीत नाहीत, ही फार उत्तम गोष्ट आहे. नाहीतर देश आज कोठल्या कोठेच जाऊन पडला असता.

निजलिंगप्पांनी चारित्र्य, प्रामाणिकपणा इत्यादींबाबत जे विचार मांडले, ते फार गंभीरपणे मांडलेले नसावेत, अशी आम्हांला पूर्ण खात्री वाटते. ते उत्तम विनोदी बोलतात, हे सर्वांना ठाऊकच आहे. त्यांच्या विनोदकारंज्यातीलच हा एक गोड फवारा आहे, अशी माझी तर पक्की खात्री आहे. परमेश्वर करो आणि काँग्रेसच्या उमेदवारावर हा दारुण प्रसंग न ओढवो! माझी त्यांना पूर्ण सहानुभूती आहे.

## कृषिविद्यापीठाची खूषखबर

कळाले ना तुम्हांला? विदर्भात निराळे 'कृषिविद्यापीठ' स्थापन करण्याची घोषणा झाली बरे का! छान झाले! 'राहुरी की अकोला' या वादात महाराष्ट्र सरकारने 'राहुरीत का?' अशी पुस्तिका प्रसिद्ध केली त्याच वेळी मला वाटले होते की, ही गोष्ट आता लवकरच घडणार. मुख्य मंत्र्यांनी ही जी आनंददायक घोषणा केली त्या वेळी असे सांगितले म्हणतात की, लोकांचे दडपण आले म्हणून किंवा विदर्भातल्या लोकांनी उग्र आंदोलन केले म्हणून आम्ही हा निर्णय केला ही समजूत चुकीची आहे; विदर्भाची मागणी ही रास्तच होती आणि आम्ही तिचा विचार करीतच होतो; आता फक्त घोषणा केली इतकेच. मुख्य मंत्र्यांचा हा खुलासा वाचून माझे अगदी पूर्ण समाधान झाले. माझी पहिल्यापासूनच खात्री होती की, आमचे महाराष्ट्र सरकार पहिल्यापासूनच कणखर आहे. कोणाच्या दडपणामुळे ते

नमणारे नाही. मागे सांगलीला यशवतराव येऊन गेले. विरोधकांनी केवढी निदर्शने केली. पण आमचे कणखर काँग्रेसवाले नमले म्हणता काय ? नाव नको. विरोधकांची डोकी फोडून आणि त्यांची हाडे मोकळी करून त्यांनी आपल्या कणखरपणाचा असा काही तेजस्वी आविष्कार दाखवला म्हणता ! बस् बस्, काही विचारू नका. मागे संयुक्त महाराष्ट्राच्या वेळी तरी सरकार जनतेच्या दडपणापुढे नमले म्हणता की काय ? मुळीच नाही. संयुक्त महाराष्ट्राची मागणी रास्त होती आणि तिचा काँग्रेसवाले विचार करीतच होते. योग्य वेळ आल्याबरोबर त्यांनी संयुक्त महाराष्ट्र करून टाकला ! मग आता तरी तुम्हांला शंका का यावी ?

बाकी यामुळे एक गोष्ट झाली, पहिल्यांदाच विदर्भाला कृषिविद्यापीठ दिले असते तर सबंध महाराष्ट्रात एकच विद्यापीठ राहिले असते. पण पहिल्यांदा पश्चिम महाराष्ट्राचा नंबर लागला. त्यामुळे आता दोन कृषिविद्यापीठे झाली. इतकेच नव्हे तर, मराठवाडा आणि कोकण यांना दोन उपकेंद्रेही मिळणार आहेत. (येत्या दहा वर्षांत तर स्वतंत्र कृषिविद्यापीठ या दोन्ही भागांना मिळणार आहे.) म्हणजे आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन ' ही म्हण आता बदललीच पाहिजे. जनता मागते एक विद्यापीठ आणि सरकार देते दोन ही म्हण आता रूढ व्हायलाच पाहिजे. (आंधळ्याला दोन डोळेच मिळाले असे नव्हे तर वर पुन्हा दोन उपनेत्र–म्हणजे चाळशीही–मिळाली ! )

ही घोषणा करून सरकारने विरोधकांच्या शिडातली हवाच काढून घेतली आहे असे एक काँग्रेसचे पुढारी म्हणाले. खरेंच आहे ते ! सरकारच्या नावाने शंख करता नाही का ? घ्या म्हणावे आता एक सोडून दोन विद्यापीठे, अन् पुन्हा वर दोन उपकेंद्रे, कशी जिरली लेको ! ... बघू आता काय दिवे लावताते. ह्या एवढ्या मोठ्या विद्यापीठासाठी आणखी कित्येक कोटी रुपयांचा खर्च लागणार त्याचे काय करणार, तो पैसा कुठून उभा करणार असाही मूर्खपणाचा प्रश्न आणखी विचारू नका. विचाराल तर तुमचेच जगात हसे होईल, पैसा कसा उभा करावा ही चिंता भारतासारख्या थोर परंपरा असलेल्या देशाला पडण्याचे कारणच काय ? ती चिंता धनधान्यांनी समृद्ध असलेल्या अमेरिका, रशिया असल्या राष्ट्रांना. आपल्याला ती निष्कारण काळजी कशाला हवी ? आपले काम फक्त तोंड वेंगाडण्याचे. हातात झोळी घेऊन बाहेर पडायचाच अवकाश आहे. जगातले दाते तयारच आहेत. आमच्या पदरात ओतण्यासाठी ते पैसे घेऊनच बसलेले आहेत. त्यांच्या दातृत्वाची कसोटी पाहण्याचे काम परमेश्वरानेच आपल्यावर सोपवलेले आहे. आता हे चांगले निमित्त सापडले. सोडू नका चोरांना, नाहीतरी गोरगरिबांना लुटूनच ही साम्राज्यवादी राष्ट्रे पैसेवाली बनली आहेत ना ? मग चोरच ते. त्यांना लुबाडायला कसली आली आहे हरकत ? दोन कृषिविद्यापीठांचे मी याच दृष्टीने स्वागत करतो.


—ग्यानबा

। विजय तेंडुलकर । लेखांक चार ।

रात्रभर आपल्याला ते खरेच वाटले नाही. असे, इतके सहज माणसाच्या आयुष्यात काही चांगले होते हे नवीन होते, अनपेक्षित होते. दुसऱ्या दिवशी सौम्य मुद्रेच्या आणि स्निग्ध नजरेच्या त्या बंगाली दिग्दर्शकाला आपण जाऊन सरळ विचारले, खरेच मला तुम्ही हिरॉईनच्या भूमिकेसाठी निवडले आहे? आपल्या नजरेतला अविश्वास न्याहाळीत मंद हसून त्याने म्हटले, होय, उषा. त्याच्या स्वरांत विश्वास होता. आता हे खरे मानणे भागच होते. आपण कुठे तरी येऊन पोचलो याचा अननुभूत आनंद आणि हे सारे आपल्याला पेलेल का, की नवी अवहेलना पदरी येईल याची भीती अशा दोन्हींच्या कात्रीत आपण सापडलो होतो. अशोककुमारचा धाकटा भाऊ अनुपकुमार याला नायकाच्या भूमिकेसाठी निवडण्यात आले. तोही तसा नवखा होता. त्या चित्रपटात अभिनेत्री म्हणून प्राथमिक गोष्टी शिकण्यातच पुष्कळ काळ गेला. या आधी कॅमेऱ्यासमोर आपण चाललो

# शुभं करोति

होतो, बोललो होतो, हसलो-रडलो होतो. पण हे सारे कसे, किती आणि का करावे हे कुणीही सांगितले नव्हते. काही गोष्टी आपल्या अकलेने जे करीत होतो ते दिग्दर्शकांना मंजूर होत होते. या बंगाली दिग्दर्शकाने प्रथमच आपल्याला चित्रपटामागच्या शास्त्रात नेण्याला सुरुवात केली. चालण्या-बोलण्यापासून प्रत्येक गोष्ट विशिष्ट पद्धतीनेच आपल्याकडून करवून घेण्याला सुरुवात केली. कितीही विचारले



राजकपूर । उषाबाई । वैजयंतीमाला । नझराना । १९६१ ।

तरी तो समजावून सांगे. कधी चिडत-करवादत नसे. आपल्यात एक आत्मविश्वास उत्पन्न करून हा आत्मविश्वास तो सतत आवर्जून सांभाळीत असे. तो म्हणे,उषा, तुला ते येतेच आहे; फक्त मी सांगतो असे कर.

हे तर अगदी नवे होते. आपण करू त्यात संतोष मानणारे दत्ता धर्माधिकाऱ्यां-सारखे दिग्दर्शक, आपल्याला हवे तेच उषाकडून मिळावे म्हणून चिडणारे, वैतागणारे विश्राम बेडेकरांसारखे दिग्दर्शक, याहून हा बंगाली माणूस अगदी वेगळाच होता. सेटवर जाताना आपल्याला कधी नव्हे ती हौस वाटू लागली. बोली हिंदी शिकण्याला आपल्याला विशेष त्रास पडला नाही. अभिनयाचे काही विशेष शिकण्याआत या चित्रपटाचे शुटिंग पुरे झाले आणि चित्रपट फारसा चालला नाही. तरीही आपण

सुखात होतो. चित्रपटाचे आर्थिक किंवा कलात्मक यश यापेक्षाही आयुष्याला एक सुखद अनुभव. असेच या चित्रपटाचे आपल्या लेखी स्थान राहून गेले होते.

उषा स्वत:शीच हसते. माडीवरच्या आडव्या खिडकीवाटे समोर लांब जुहूचे वाळवंट दिसते. माडाची काही उंच मुकी झाडे. निश्चल वाटणारी समुद्राची रुपेरी पट्टी. वर निळे आभाळ आणि त्यात एखाद-दुसरा वाहत जाणारा चुकार ढग. कलात्मक यश म्हणजे काय? आर्थिक उत्पन्नावर कलात्मक यश अवलंबून नसतेच काय? आपण कोणता अभिनय त्या काळात करीत असू?

'स्त्री जन्मा ही तुझी कहाणी' मध्ये पान्हा येऊन मूल पाजण्याचा प्रसंग होता. आपण अविवाहित; हा अनुभव कधीही न मिळालेला. दिग्दर्शकांनी फक्त प्रसंग मांडून दिला. उषाबाई, जमेल ना? असे विचारून घेतले. आपण पान्हा अनावर झाल्याचा, मूल पाजल्याचा मुद्राभिनय कॅमेऱ्यापुढे केला. कसा केला? कोणी तो आपल्याला शिकवला नाही. समजावून देण्याआड दिग्दर्शकाचा संकोच येत होता. आपण मनात ती स्थिती आणली. अभिनय घडला. मूल पिताना कॅमेरा केवळ चेहऱ्यावर होता आणि चेहऱ्यावर त्या अनुभवातले सारे तपशील आपण आणले. दिग्दर्शक तर संतुष्ट झालेच पण प्रेक्षकही नंतर भारावून पाहत. आया-बाया गहिवरत. या मुलीचे अजून लग्नही झालेले नाही यावर त्यांचा विश्वासच नसे. हे आपल्याकडून कसे घडले त्याची रीत आपल्यालाही सांगता आली नसती. हा अभिनय नव्हताच. हा एका वेगळ्या पातळीवर घेतलेला आईपणाचा अनुभव होता. अभिनेत्री अजून फार दूर होती. त्या वयाची मुलगी म्हणूनच पुष्कळसे घडे, इतकेच खरे.

तरीही एकाच वेळी आलटूनपालटून आपण मराठी-हिंदी चित्रपटांच्या सेट्वर जात असू आणि त्या त्या भाषेचे उच्चार, लकबी, भूमिकेतला सांस्कृतिक फरक यात कुठलीही गल्लत आपल्याकडून सहसा होत नसे. अगदी अभिनयातदेखील जमीन अस्मानाची तफावत असे. मराठीचा अभिनय बराच ढोबळ, वटवटीत तर अमियांच्या हिंदी चित्रपटातला अभिनय बारकाव्यांवर भर असलेला, सौम्य आणि देखणा असत असे. एकीकडचे दुसरीकडे होऊन चालत नसे. मराठी चित्रपटाच्या सेटवर सौम्य अभिनयाचा चुकून अवलंब घडला तर दिग्दर्शक म्हणत, उषाताई,



। कन्यादान । १९६२ ।

आज तुमचा मूड दिसत नाही. अभिनय कमी पडतो आहे. तेच हिंदी चित्रपटाच्या सेटवर अनवधानाने जरा भडक झाले की अमिया त्यांच्या सौम्य पद्धतीने म्हणत, उषा, इतके आक्रस्ताळी ॲक्टिंग बरे नव्हे.. कॅमेऱ्यासमोर सगळे नैसर्गिक दिसले पाहिजे, देखणे वाटले पाहिजे. रडायचे तरी चेहरा वेडावाकडा करून कॅमेऱ्यासमोर रडणे नको; कॅमेऱ्यापुढे भावना व्यक्त होते तेव्हा ती कोणतीही असली तरी पडद्यावर सहजसुंदर वाटली पाहिजे. कुरूप दिसणे फिल्म ॲक्टिंगला परवडणारे नसते. या दोन टोकांत आपण स्वाभाविकपणे वावरत होतो. जिकडचे तिकडे घेत होतो आणि ठेवून बाहेर पडत होतो. आज विचार केला तर हे कठीण वाटते. पण आपले असे एकसंध, सुसंगत असे व्यक्तिमत्त्व आपल्या अभिनयाला तेव्हा लाभले नव्हते हेही जाणवते. आपल्या कलेची मूर्ती घडत होती आणि

तो घडविणारा मूर्तिकार होता अमिया चक्रवर्ती हाच. त्याने धीरे धीरे आपले ब्राह्मणी, हडसभडस व्यक्तिमत्त्व बदलून त्या जागी कॅमेऱ्यासाठी एक भारतीय, मुलायम लोभस व्यक्तिमत्त्व निर्माण केले. 'गौना' आणि 'पतिता' यांतली आपल्या अभिनयांतली तफावत पाहिली की या माणसाने आपल्यासाठी काय केले ते लक्षात येते. 'पतिता'त आपण एक यशस्वी हिरॉईन म्हणून हिंदी चित्रसृष्टीत आलो. बापूंचे आपल्याविषयीचे स्वप्न साक्षात पुरे झालेले त्यांनी पाहिले. आपण आता एक स्वप्न जगू लागलो होतो. आयुष्यात प्रथमच स्वप्नासाठी अवसर सापडला होता...

'पतिता'आधीचे 'वासुदेव बळवंत'च्या सेटवरचे क्षण आठवतात. एकेक दृश्य घेताना विश्राम बेडेकर आपल्याला नामोहरम, नाउमेद करून सोडीत. त्यांच्या मनासारखे आपल्याला काहीसुद्धा जमत नसे. त्यांची नाखूष, उद्विग्न मुद्रा पाहून वाटे की आपण नटी नाहीत, कलावंत नाहीत, कोणीसुद्धा नाहीत. आपल्याला हा माणूस हवे म्हणतो ते कधीही येणार नाही, समजणारदेखील नाही. इथून घरी जावे. पुन्हा या कलेचे नाव म्हणून घेऊ नये. आपण अगदी रडकुंडीस येत असू. अशा वेळी एकच आधार शिल्लक असे. अमियांच्या 'दाग' चित्रपटाचे चित्रीकरण त्या काळात त्याच स्टुडिओत चालू होते. त्यात आपल्याला छोटीच भूमिका होती. त्या सेटवर गेलो की आपण 'वासुदेव बळवंत'मधल्या भूमिकेतल्या अडचणी अमियांना विचारीत असू. त्यांच्याशी चर्चा करीत असू. ते लहान मुलाला समजवावे तसे आपल्याला सारे समजावून सांगत. उषा, तुला सारे येतच आहे असे विलक्षण उमेद देणाऱ्या स्वरांत म्हणत म्हणत बेडेकरांच्या सेटवर जमीनदोस्त झालेला आपल्यातला कलावंत पुन्हा उठवून उभा करीत. बेडेकरांसारख्या प्रतिभाशाली दिग्दर्शकाला काय हवे आहे त्याची समज देऊन पाठवीत. आणि आपण बेडेकरांच्या सेटवर पुन्हा जात असू त्या नव्या जिद्दीने, उमेदीने, आत्मविश्वासाने—अर्थात पुन्हा दिवसाअखेरी मोडून तोडून पुरत्या भग्नमनस्क होण्यासाठी. पुढे अमिया चित्रीकरणादरम्यानच्या सुटीत आपल्याला येऊन भेटू लागले. त्यांना कळले होते की ही उषाची गरज आहे. बेडेकरांशी ते नितांत आदराने वागत—प्रत्यक्ष आणि मागेही. आपला बेडेकरांविषयीचा राग ऐकून घेऊन वारंवार ते शांतपणे म्हणत, उषा, तो मोठा माणूस आहे. त्याला काय हवे ते समजावून घे. तो म्हणतो ते निरर्थक असणे शक्यच नाही. बेडेकरांविषयीचा आपला आदर त्या काळात कायम राहिला, वाढला तो मुख्यतः अमियांमुळे. त्यांच्यामुळेच 'वासुदेव बळवंत'मधली आपली भूमिका बेडेकरांच्या थोडी तरी मनासारखी वठली. पण उपयोग नव्हता. 'वासुदेव बळवंत'च्या आरंभीच्या काळात 'उषा' म्हणून हाकारणारे बेडेकर अखेरच्या चित्रीकरणाच्या वेळी 'मिस् मराठे' असे कोरड्या स्वरांत पुकारू लागले होते...

अखेरचे चित्रीकरण अजून लक्षात आहे. चित्रपट पुरा झाल्यासारखा होता. बेडेकरांकडून फोन आला. पाण्यातले एक दृश्य घ्यायला हवे. त्याचे चित्रीकरण


ठरले तेव्हा आपल्या अंगात दीडदोनपर्यंत ताप होता. आपण चित्रीकरणाला हजर झालो पण विनंती केली की अंगात ताप आहे, मला थंडी वाजते आहे. पाण्यात उभे करू नका. बाकी कसेही ते दृश्य घ्या. बेडेकरांनी ते दृश्य आपल्याला पाण्यात उभे करून घेतले. दीर्घकाळ थंडगार पाण्यात राहिल्याने चित्रीकरण संपले तेव्हा ताप चारपर्यंत चढला होता. चित्रीकरणाच्या वेळचे बेडेकरांच्या उगीच रागीट वाटणाऱ्या मुद्रेवरचे कर्तव्यकठोर गांभीर्य आणि त्यांच्या नजरेतला कोरडा अलिप्तपणा अजून आठवतो आहे. तेव्हा प्रश्न पडला होता, हा मोठा माणूस आपल्याशी असे का वागतो आहे ? आता असले प्रश्न पडत नाहीत. शिल्लक राहिला आहे तो दिग्दर्शक विश्राम बेडेकरांविषयीचा आदर आणि कृतज्ञता; आणि कसोशीने आपल्या मनात हे कायम राखणारा, वाढवणारा अमिया चक्रवर्ती नावाचा दुसरा कलावंत माणूस. त्याने आपल्याला अभिनेत्री म्हणून प्रतिष्ठा आणि प्रसिद्धी दिली. त्यानेच कलेकडे पाहण्याचा दृष्टिकोण दिला, कलाक्षेत्रातल्या माणसांकडे पाहण्याची दृष्टी दिली. आपल्यातल्या कलेला बंधमुक्त केले. त्याहीपेक्षा, पितृवत् आधार दिला. विश्वास दिला. तेव्हा दुर्मिळ होते ते हे. बापू आपले व्यवस्थापक आणि नियंत्रक होते. अमिया त्या काळात वडील होते. त्याहीबरोबर, मित्र होते. लीलाताई लग्न होऊन गेल्यानंतर आपल्याला दुसरी मैत्री नव्हती. त्यामुळेच या मैत्रीचे मोल आपण फार केले, फार दिले...

उषा उसासून लांब समोरचे, वाळवंट आणि निर्जीव समुद्र खिडकीवाटे न्याहळीत राहते. समोरचा समुद्र नितळ असतो, आतला खळबळत, उफाळू पाहत असतो. समोरचे आभाळ निळाईने भरलेले असते, आतले बेचैनीने भरभरून येऊ लागते. खिडकीपासून उषा दूर सरकते. स्वयंपाकघरात उतरते. घरकामात स्वतःला हट्टाने गुंतवते. आत आतल्या वाढल्या वादळापासून स्वतःला ओरबाडून दूर खेचीत राहते. काही केल्या चैन पडत नाही. उषा तशीच पिशासारखी दिवाणखान्यात येते. थबकून समोरच्या सुखी, प्रसन्न दाम्पत्याचे फ्रेम केलेले छायाचित्र एकटक डोळाभर पाहत उभी राहते. त्यातली 'ती' मुळीच महत्त्वाची नसते; महत्त्वाचा असतो 'तो'. 'त्या'ची

उमदी, हसरी, मिष्किल मुद्रा पाहताना आतले वादळ बघता बघता निवत जाते. सुटलेला तोल सावरला जातो. ढळलेले पाय फिरून स्थिरावतात. एकदम श्रान्त शांत वाटू लागते. कृतज्ञतेनं उषाचे मन भरभरून येते. स्वत:शीच ती पुटपुटते. मनोहर.... थँक्स अ लॉट, डार्लिंग.... तू माझा केवळ मित्रच नाहीस, माझा केवळ पिताच नाहीस, तर तू माझा देव आहेस, देव....

किती तरी वेळ त्या छायाचित्राशी उषा तशीच बसून राहते; आणि बाहेर जग धावत पळत घोटाळत रेंगाळत मोठमोठ्यांदा गोंगाट करीत आणि मध्येच क्षणिक नि:स्तब्ध होत एकसारखे वाहत असते. उषाला वाटते, ते कुणासाठीच थांबत नाही, मागे वळत नाही. त्याच्याबरोबर कितीतरी हव्याशा आणि नकोशा गोष्टी ते खेचून, हिसकून अल्लद काढून घेऊन, पण नेत असते.... नेतच असते.... पार विस्मृतीत.... किंवा स्मृतीतल्या एका खोल खोल, अंधाऱ्या कपारीत....

एकजण येतो. येऊ का म्हणून फोन करून येतो. हातांत छोटी बॅग असते. मुद्रेवर एक विटलेपणा असतो. आल्यावर तो त्याच मुद्रेने एक कागद नाहीतर छोटी डायरी बाहेर काढतो. त्याने मुलाखतीसाठी प्रश्न काढलेले असतात. सारे पुष्कळच गृहीत धरणारे आणि नाममात्र उत्तरे मागणारे. उदाहरणार्थ : तुमच्याविषयी इंडस्ट्रीज (हा चित्रपटसृष्टीला लावण्यात येणारा एक विलक्षण शब्द : उद्योगधंदा. आणि मग कलेचे काय ?) तुम्ही फार शिष्ट आहात अशी बोलवा आहे. तुमचे त्याबद्दल काय म्हणणे आहे ? किंवा अभिनयाचे तुमचे तंत्र अमूक तमूक



। दाग । १९५१ ।

प्रकारचे नाही तर त्या अमूक देशी किंवा विदेशी नटीसारखे आहे, नाही का ?

समोर बसलेल्या सौ. उषा मनोहर खेरला एकीकडे या प्रश्नांचा राग येतो आणि या स्वयंमन्य पोटार्थी माणसाची कींव वाटते. कलेशी बादरायणदेखील संबंध नसलेला हा प्राणी कलावंतांच्या मुलाखती घेतो आणि परिचय लिहितो. मग तिला वाटते की कलेशी संबंध नसलेली आणखीही बरीच माणसे खुद्द चित्रपटसृष्टीत निर्माते आणि दिग्दर्शक बनून तोंडात पाइप धरून अधिकाराने कलेवर बोलतात, या गरीब माणसाचा तरी मग राग कशाला ? सत्यजित रायवर टीका करणारा दहाव्या दर्जाचा बाजारू दिग्दर्शक आपण याच दिवाणखान्यात कधीमधी खपवून घेतो, मग यानेच काय गुन्हा केला आहे ? उषा उत्तर देण्याचा प्रयत्न करते. अभिनयाचे माझे तंत्र....

‘ स्त्री जन्मा ’पर्यंत तर आपण कॅमेऱ्यापुढे जे काही करीत होतो तेच आपले अभिनयाचेतंत्र होते. म्हणजे आपण मुळी अभिनय म्हणून फारसे काही अभ्यासपूर्वक करीतच नव्हतो. ‘ वासुदेव बळवंत’ आणि ‘ गौना ’ ही अभिनय ‘ कले ’तली आपली पहिली पावले ठरली. बोलण्याचालण्यापासून सारे इथून शिकलो. हे शिकलो की कॅमेरा हा फार कठोर निरीक्षक असतो. तो बारीकसारीक तपशीलदेखील नेमका टिपतो आणि तो मोठा करून पडद्यावर मांडतो. यासाठी त्याच्यासमोर नटाने किंवा नटीने फार सांभाळून नि हिशेबीपणे वावरले पाहिजे. सारे काही शिस्तीने तरीही प्रसंगाला साजेशा सहजपणे केले पाहिजे. उठण्याबसण्यापासून आणि मानेच्या नि हातांच्या कोनापासून सारे नीटस, डौलदार आणि भूमिकेला नि प्रसंगाला धरून हवे.

‘ दाग ’च्या वेळी भूमिका लहान होती पण अभ्यास खूप घडला. दिग्दर्शक आपल्याला मुद्दाम, आपली भूमिका नसतानाही, सेटवर ठेवीत. इतरांचा अभिनय पाहायला लावीत. इतरांना कॅमेऱ्यापुढे काम करताना जेवढे शिकता येते तेवढे चांगले स्वतः कॅमेऱ्यापुढे असताना शिकता येत नाही. दुसऱ्या नटीच्या किंवा नटाच्याही निमित्ताने आपणच कॅमेऱ्यापुढे तो प्रसंग वठवतो आणि बाजूला बसून आपणच त्याचे गुणदोष मनाशी ठरवतो. इतरांचे तंत्र आणि एक कलावंत म्हणून अनेक सवयी, खोडी आणि आवडी-निवडी यांचा मिळून बनलेला आपला स्थायीभाव यांची वेगवेगळ्या प्रकारे सांगड घालून आपले असे तांत्रिक हिशेब पक्के करण्याचा प्रयत्न करीत असतो. हे हिशेब मग आपल्या भूमिकेच्या वेळी आपल्याला पडताळून पाहता येतात. मग त्या भागाचे ‘ रशेस ’ पाहताना कधी हे हिशेब जमल्याचे आढळते तर कधी ते चुकल्याचे लक्षात येते. यासाठी फार चोखंदळ नजर नको. कॅमेऱ्याने टिपून मोठ्या पडद्यावर मांडलेले दृश्यच आपले चोखंदळ टीकाकार ठरते.

‘ दाग ’चा असा सारा अनुभव ‘ पतिता ’मधल्या मोठ्या आणि महत्त्वाच्या भूमिकेला बराच उपयोगी पडला. तरीही भावनांचे प्रकटीकरण कसे आणि किती करावे याचे ज्ञान कमी होते. तुटक तुटक घेतल्या जाणाऱ्या एकेका दृश्याच्या तुकड्यात या प्रकटीकरणाचे प्रमाण किती राहावे हे तर ठाऊकच नव्हते. दिग्दर्शकांनी आपल्याकडून याची जाणीव दिली, मार्गदर्शन केले, नाउमेद न करता त्यांचे समाधान होईतोवर त्या त्या प्रसंगाचा, प्रसंगाच्या तुकड्याचा ‘ रियाझ ’ करून घेतला. एकेकदा तेच तेच दहादा, वीसदा करून आपण शरीराने, मनाने थकत असू, अगदी अर्धमेल्या झाल्यागत पडत असू. ताणामुळे मुसमुसून रडत असू. परंतु या सगळ्यांत आपण एकट्या नाहीत ही जाणीव असे. तो दिग्दर्शक आपल्या साऱ्या कष्टांत शांतपणे, स्मितवदनाने आपली सोबत करी आणि अखेर ‘ टेक ’ झाला की म्हणे, उषा, छान ! फार छान ! हे दृश्य तू खूप छान केलेस. आणि आपले सारे कष्ट, ताण, मनस्ताप एकदम कसे हलके हलके होऊन जात. अंतर्बाह्य महिरून जायला होई.

सार्थक वाटे. कष्ट, धडपड पूर्वीपासूनची होती. हे असे तोंडभर, प्रसन्न, मनमोकळे कौतुक नवे होते, खूप नवे होते. आपण चित्रपटाचा अभिनय शिकलो त्या इथे. त्याही-पेक्षा या शिकण्यातला, स्वत:तल्या कलेच्या प्रकटीकरणातला आनंद आणि सार्थक आपल्याला मिळू लागले ते इथे नावारूपाला आल्यानंतर काही वर्षांनी ! लौकिक, यश आणि आपल्याला आपण सापडल्याचा आनंद यांचे गणित आपल्या बाबतीत तरी उलटे ठरले. यश आधी, मागाहून केव्हा तरी आनंद. हा आनंद अननुभूत होता...सर्वस्वाने घ्यावा, जपावा असा होता. यशाची धुंदी केव्हाच उतरली पण या आनंदाची धुंदी रक्तात आजही तशीच आहे...तशीच आहे...कॅमेरा ठेवा... लाइटस टाका...माइक सोडा... क्लॅप मारा...आजही आपण या व्यूहाचे नीट निरीक्षण करून एका हिशेबीपणाने आणि ईर्षेने तिथे आपले उत्तम जे देऊ... एकेका वारकाव्याने भूमिकेतला अणुरेणू जिवंत करू, दिग्दर्शकाची आणि प्रेक्षकांची वाहव्वा घेऊ......आजही यातली थरार रक्तात तशीच आहे. कॅमेऱ्याचे आव्हान आजही आपल्याला उत्तेजित, प्रज्वलित, बेहोष करते...

उषा जराशी अस्वस्थ होते. तिला आवेगाने म्हणावेसे वाटते, शिळोप्याच्या मुलाखती कसल्या घेता, मला उत्तमोत्तम, अवघड भूमिका द्या. प्रश्न नकोत, कॅमेरा माझ्यासमोर मांडा. तिथेच मी खरी असेन, तिथेच मी खरी आणि चांगली बोलेन....तेच बोलणे मला येते, तेंच समजते, त्यातच मला रमता येते— तेवढेच खरे ! तेवढेच !

समोरचा विटल्या मुद्रेचा मुलाखत घेणारा हातचा कागद पाहत म्हणतो, पण तुमचे अभिनयाचे 'तंत्र' कोणते ? ते थोडक्यात सांगा.

आणि उषा उठून बंद दाराशी जाते. भिंतींच्या सीमेंट काँक्रीटच्या समांतर पट्ट्यांवाटे कोपऱ्यावरचा ओकाबोका, आळसटलेला बंगला दिसतो. 'दिलीप'चा बंगला–जणू त्या बंगल्यालाच ती मनोमन विचारते, माझे अभिनयाचे 'तंत्र'

[पृष्ठ ४४ वर]



# वेडाच राहू दे!

उल्हास लुकतुके

"मला वेडाच राहू दे डॉक्टर, वेडाच राहू दे" असे म्हणून तो हमासाहमशी रडू लागला.

वेडाच राहू इच्छिणारा रोगी हा अनुभव डॉक्टरांना नवीन होता.

सरकारी हॉस्पिटलची जुनी इमारत. मनोविकारांचा बाह्यरुग्ण विभाग. वाकडचा तिकडचा, ओबडघोबड भुरकट दगडी भिंती. आतल्या भिंतींचा गिलावा उडालेला. विटलेला भकास उदी रंग. खिडकीतून येणारा प्रकाशाचा भगभगीत झोत. बाकी अंधार. वर ओकाबोका, उघडावाघडा दिवा. खडबडीत दगडांची फरशी. एकंदर वातावरण तिथे जमलेल्या खुरटलेल्या मनांना आणखी खुजट करणारं. अवजड जुनाट टेबलाच्या पलीकडे डॉक्टर अन् या टोकाला तो.

तो. आत्महत्येच्या प्रयत्नाबद्दल अटक झालेला. तुटक्या मनाचा. फाटक्या अंगाचा. गरीब चेहऱ्याचा. गुन्हेगारीपेक्षा अपराधीपणाचा भाव असलेला. जवळजवळ भीक मागून पदवीधर झालेला. पहिला वर्ग मिळून बराच

**खरं आहे, डॉक्टर. भाकरीच्या तुकड्या-साठी कुत्री भांडू शकतात. माणसं भांडली तर काय म्हणायचं? अन् भाकरी नाही मिळाली तर कुत्र्यांना काही वाटत नाही, पण माणसाला............**

काळ बेकार राहिलेला. परिस्थितीशी लढाई हरलेला. असल्या माणसाला दोन-दोन पोलिसांनी आणि धरूनबांधून कशाला आणायला पाहिजे हे डॉक्टरांना कळेना. पण पोलिसांचं नेहमी असलंच काहीतरी असतं.

हवालदारानं खाकी कागदावर नांगरलेला मजकूर वाट काढीत काढीत वाचला. कोर्टाचा मानसिक तपासणीचा हुकूम होता तो. कोर्टाच्या अवधानाचं डॉक्टरांना कौतुक वाटलं.

"काय रे, तू जीव द्यायला का निघाला होतास?"

तो गप्प.

"अरे बोल ना!"

कासवानं पाय आत ओढून घेतल्याचं डॉक्टरांच्या लक्षात आलं.

"ए भडव्या, बोलतो का नाय?" दंडाला बांधलेली दोरी वेसणीसारखी खेचून हवालदार खेकसला. कासव आणखी आकसलं.

"हवालदार..." डॉक्टरांच्या आवाजात राग.

"चुकलो साहेब."

"बाहेर जा."

बाहेर जाणाऱ्या बुटांचा आवाज. कासवानं थोडंसं डोकावून वर पाहिलं.

"बैस ना."

कासव ऐसपैस सैल झालं.

"काय झालं ते सांग बरं नीट."

कासव गप्प. डॉक्टरांनी त्याच्या दंडाला बांधलेली दोरी सोडून टाकली. त्या-सरशी कोंडलेली हवा बाहेर आली. तो खूप रडला. हमसाहमशी रडला. नंतर शांत झाला. पंक्चरलेलं टायर बसावं तसा नीट ऐसपैस, मोकळा, बूड टेकून बसला. स्फुंदत म्हणाला,

"डॉक्टर, कुणीतरी खूप ऐकून घ्यावंसं वाटतंय."

" मी ऐकेन. "

" डॉक्टर असून ऐकून घ्याल ? खरंच ?"

" खरंच. "

मग धरण फुटलं. लोंढा वाहू लागला. डॉक्टर झपाट्यानं नोट्स् काढू लागले.

" आत्महत्येचा प्रयत्न तू का केलास ?"

" मग काय करू डॉक्टर ? गरीबीत शिक्षण झालंय. नोकरी करावी ही घरच्यांची इच्छा. मिळत नाही ही परिस्थिती. मग घरी कावतात. काच करतात. घरी त्रास होतो म्हणून बाहेर पडलो तर बाहेर बेकार म्हणून कमीपणा येतो. बाहेरही चिडवतात. "

" पण तू म्हणे वेड्यासारखं करतोस !"

" हो डॉक्टर, खरं आहे. भाकरीच्या तुकड्यासाठी कुत्री भांडू शकतात. माणसं भांडली तर काय म्हणायचं ? अन् भाकरी नाही मिळाली तर कुत्र्यांचं काही बिघडत नाही; कारण, कुत्र्यांना काही वाटत नाही. पण 'काही वाटणं' हा माणसाला दिलेला शाप आहे, डॉक्टर !"

" डॉक्टर चमकले.

" छे: काहीतरीच ! 'काहीतरी वाटणं' हाच तर जनावरांत आणि माणसांत फरक आहे. " ते एकदम बोलून गेले.

" खरं आहे डॉक्टर, खूप वाईट वाटतं. पण करता काहीच येत नाही. म्हणून आणखी खूप वाईट वाटतं. नुसतंच वाईट वाटणाऱ्या माणसापेक्षा काहीच न वाटणारं जनावर बरं ! तुम्ही मला बरं करणार आहात ना डॉक्टर ?"

" हो. "

" गवंडी आहात गवंडी !"

" गवंडी ?"

" हो गवंडी. तेही साधे फडतूस गवंडी. नव्या इमारती बांधणारे कारागीर नाहीत तर उडालेल्या पोपड्यांवर गिलावा करणारे भिकार गवंडी–"

" का रे बाबा ? माझ्यावर का चिडलास ? "

" नाही तर काय ? ज्या परिस्थितीपुढे मी असहाय्य आहे ती पाडून नवी बांधायची तुमची ताकद नाही. थोडीफार डागडुजी करून तुम्ही मला मात्र बरे करणार. म्हणतो ना , नव्या इमारती बांधणारे कारागीर नाहीत तर गिलावा मारणारे फडतूस गवंडी आहात तुम्ही ! बदलू शकाल ती परिस्थिती तुम्ही ? "

" नाही. "

" आणि तरीही तुम्ही मला बरं करणार ? "

" हो. "

" कसं काय ? "

" ? "

" मीच सांगतो आता. असं जर असेल ना डॉक्टर, तर मला बरं करायचं म्हणजे शहाणं करायच्या ऐवजी जनावर करा तुम्ही मला. कराल ? कराल तुम्ही माझं जनावर ? "

तो स्वतःशीच विचित्रसं हसला.

" कारे, हसलाससा ? " डॉक्टर.

" हसू नाही तर काय करू ? काही करा म्हणणारा मीही वेडा. काही करू पाहणारे तुम्हीही वेडे. खरं सांगा डॉक्टर, शहाणं व्हायचं सोडून द्या. जनावर व्हायचं ठरवलं तरी ते व्हायला आपण मोकळे आहोत का ? सांगा डॉक्टर, मोकळे आहोत का ? सांगा ना, बोला. बोला...."

म्हणता म्हणता तो पिसाळला. बाहेर धावायला लागला. डॉक्टरांनी त्याला पकडलं.

" तुम्हीही शेवटी पकडलंतच ना मला डॉक्टर. मला वाटलंच होतं. हे हॉस्पिटल जेलसारखं दिसतं बाहेरून. उंच उंच दगडी भिंती. अंधाऱ्या खोल्या. पोपडे उडालेला गिलावा. उदास उदी रंग. इथे मी अडकून पडणार हे मला माहीत होतं. तुम्ही जेलर आहात डॉक्टर, जेलर आहात–मला सोडा–मला सोडा–जाऊ द्या मला–जाऊ द्या–जाऊ द्या म्हणतो ना ..." कर्कश ओरडून तो हात हिसकावून घेऊ लागला. डॉक्टरांनी धरलं होतं म्हणून बरं–नाही तर...

घाईघाईनं इंजेक्शन दिलं. एक–दोन सेकंदांत तो खाली आला. त्याचा हात हातांत धरून डॉक्टर तसेच बसून होते.

" माफ करा डॉक्टर, खूप देखावा केला ना इथे मी ? " त्याचा हात अजून डॉक्टरांच्या हातांत.

" आभारी आहे मी तुमचा. हात दिलात म्हणून जगलो. "

" यू आर वेल्कम्. " त्याला थोपटत डॉक्टर म्हणाले, " पण तू काही सांगत होतास ना मला ? 'काहीतरी वाटण्या' बद्दल काही तरी म्हणत होतास. "

" हं, आठवलं. मी म्हणत होतो, खूप वाईट वाटतं डॉक्टर, खूप कमीपणा वाटतो. सगळं जिणं निरर्थक वाटतं. एकच मार्ग उरतो मग..."

" तो आत्महत्येचा होय ? "

" नाही. "

" मग ? "

" स्वप्नात जाण्याचा. पंख लावून स्वर्गात जाण्याचा. उडत उडत नंदनवनात जाण्याचा ! जिथे पऱ्या असतात. देवदूत असतात. नोकरी असते–भूक नसते—"

" पण अशी मनोराज्यं रचणं हे वेडेपणाचं लक्षण आहे. "

" खरं आहे. मग ? देता का नोकरी ? भागवता का भूक ?" – स्वरांत राग, तुटकपणा—" उलट लोकांविरुद्ध गाऱ्हाणं आहे. मी माझ्या स्वप्नात असतो तिथे हे

कशाला येतात तडमडायला ? का खेचतात त्यातून मला बाहेर ! का परत खऱ्या जगाचे गरम तोबरे देतात ? का ? का ? लोक जेव्हा 'वेडा वेडा' म्हणून चिडवायला लागले, मला स्वप्नातही राहू देईनात, तेव्हा मी हरलो डॉक्टर, साफ हरलो. एकच मार्ग होता—वाकड्या वळणाचा होता हे मला माहीत होतं—पण इलाज नव्हता—त्या मार्गानं जायला लागलो तर तिथेही पोलीस कडमडले ? का ? का ? का ? "

डॉक्टर निरुत्तर.

" म्हणून म्हणतो डॉक्टर, मला वेडाच राहू दे. स्वप्नात का होईना, माझ्या जगात मला काही स्थान आहे, किंमत आहे. बेकारीपासून, भुकेपासून सुटका आहे. खरंच डॉक्टर, पदर पसरून विनंती आहे, मला वेडाच राहू दे. "

× × ×

थोड्या वेळानं त्याचे वडील आत आले. पायानं अधू, अंगावर चिंध्या पण स्वच्छ. डॉक्टरांना वाटलं ते शिकलेले असावेत.

" डॉक्टर, कृपा करा, पाया पडतो. पण माझ्या मुलाला मन ताळ्यावर असल्याचं सर्टिफिकेट द्या. "

डॉक्टर चक्रावले.

" का ? असं सर्टिफिकेट देऊन कुठं नोकरी मिळणार आहे का ? "

" नाही ! "

" मग कशाला पाहिजे ? "

वडलांच्या ओठांशी शब्द घुटमळतात, पण बाहेर येत नाहीत.

" तुमचा मुलगा वेडा आहे हे तुम्हांला माहीत आहे ना ? "

" हो. "

" मोकळा सोडला तर तो कदाचित जीव देईल हेही तुम्हांला कळतं ना ? "

" हो. "

" मग त्याच्यावर काही उपचार करण्याऐवजी तो ठीक असल्याचं सर्टिफिकेट मागताय ? वडील आहात का कोण आहात ?"

" सैतान म्हणा हवं तर, पण पाहिजे तसं लिहून द्या !"

" सैतान म्हटलं तर चालेल ?"

" हो. न चालायला काय झालं ? फक्त वाईट दिशेनं का होईना पण आपल्या इच्छेप्रमाणे वागायला तो मोकळा असतो. माणूस होऊन प्रत्येक इच्छेपावली ठोकर खाण्यापेक्षा वाईट वागायला मोकळा असलेला सैतान होणं मला आवडेल."

" काय झालेलं आवडेल ते बघू नंतर. आधी त्याच्या उपचाराचं बोला. काही उपचार का करीत नाही ?"

वडलांच्या तोंडाशी पुन्हा शब्द घुटमळतात, पण बाहेर येत नाहीत.

" काय ? काही उपचार का करीत नाही ?"

" पैसे नाहीत साहेब. इथेच ठेवून घेता का त्याला ?"

" आत्महत्येचे विचार असलेले रोगी आम्ही इथे ठेवत नाही. चोवीस तास त्याच्याबरोबर कोणी राहणार असेल तर ठेवू."

" कुणीच इथे राहू शकणार नाही. परवडणारच नाही साहेब, ते आम्हांला."

" मग येरवड्याला जा. तिथे घेतील त्याला ठेवून. चिठ्ठी देऊं का ?"

" म्हणजे दोघांचं बसचं भाडं, एक दिवस तिथं राहणं...तितकेसुद्धा पैसे नाहीत साहेब, माझ्याजवळ."

गरीबीचं हे तांडव पाहून डॉक्टर हरवून गेले. ते परत आले ते वडलांच्या शब्दांनी—

" म्हणून म्हणतो साहेब, त्याचं मन ताळ्यावर असल्याचं सर्टिफिकेट द्या. तो वेडा आहे हे मला माहीत आहे. त्याला मोकळा सोडला तर तो जीव देईल हेही मला माहीत आहे; पण तरीसुद्धा सर्टिफिकेट अशासाठी पाहिजे डॉक्टर की, मग माझ्या मनाला काही समाधान राहील, काहीतरी उपचार केल्यासारखं वाटेल. अन् शिवाय, तो शहाणा ठरल्यावर त्यानं जीव दिला तर त्याची जबाबदारी त्याच्या डोक्यावर राहील साहेब ! माझ्या मनाला तरी टोचणी राहणार नाही. एवढी कृपा करा डॉक्टर, पदर पसरतो तुमच्यापुढे. आता तरी पटलं का मी सैतान नाही, बाप आहे. पाहवत नाही म्हणून सर्टिफिकेट मागतोय. काही चूक असेल तर सांगा."

× × ×

डॉक्टर वैतागले. साधी साधी माणसं, पण त्यांनी डॉक्टरांना पार उखडवून टाकलं होतं. एकाला जनावर व्हायचं होतं. एकाला सैतान व्हायचं होतं. आयुष्यात काहीच न होऊ शकलेली माणसं अजूनही काहीतरी व्हायला मागत होती. प्रश्न विचारत होती. वाटून काही करू न शकणाऱ्या माणसांपेक्षा काहीच न वाटणारं जनावर बरं नाही का ? वाईट दिशेनं का होईना वागायला मोकळा असलेला सैतान होणं बरं नाही का ? हजारो प्रश्नांची भुतावळ डोक्यात नाचू लागली. क्रुद्ध करू लागली. क्रुद्ध करू लागली. ओरडू लागली. डॉक्टरांनी आपलं डोकं गच्चं धरून ठेवलं. त्यांना वाटलं, एक प्रश्न आपल्या डोक्यात घण मारतोय. आपलं डोकं फुटून जाईल. डोक्यात घण मारणाऱ्या प्रश्नाकडे त्यांनी रोखून पाहिलं. तो समंधासारखा थयथया नाचत विचारत होता,

" बोल, काही करायला मोकळा आहेस तू ? बोल, आहेस तू मोकळा ? बोल ! बोल !! बोल !!! घण् ! घण् !! घण् !!! घणाण् घण !!!"

डॉक्टरांनी आपलं डोकं आणखी गच्च धरून ठेवलं, डोळे झाकून घेतले अन् ते पुटपुटले, " शहाणं असून प्रश्न असण्यापेक्षा, वेडं असून प्रश्न नसलेलं फार बरं."
आणखी मान खाली घालून ते पुढे पुटपुटले, " डॉक्टर, मला वेडाच राहू दे !" ○


# स्वतःच्या शोधात

## एक राष्ट्रीय जीवन-प्रयोग

सुधाकर राजे

गेल्या उन्हाळ्यातली गोष्ट. उत्तर भारतातली एक शाळकरी मुलगी सुटीत मद्रासला एका अनोळखी कुटुंबात राहायला गेली. त्या कुटुंबाने तिला स्वतःची मुलगी मानले. घरी परतल्यावर तिने त्या कुटुंबाला पत्रात लिहिले-" जसे आम्ही भारतीय आहोत, तसेच तुम्ही पण आहात हे कळल्यावर मला किती नवल वाटले अन् आनंदही झाला......" या संवेदनाशील किशोरीला भारताच्या एकात्मतेचा साक्षात्कार आपोआप झाला का ? नाही—तो घडायला 'आंतरराष्ट्रीय जीवन-प्रयोग' ('एक्सपेरिमेंट इन् इंटरनॅशनल लिव्हिंग') या संस्थेने हेतुपूर्वक हातभार लावला होता. 'एक्सपेरिमेंट'च्या आंतर-भारतीय ('इंट्रा-इंडिया') कार्यक्रम'मुळेच ही मुलगी एका दूरच्या भागात एका अपरिचित कुटुंबाचा घटक म्हणून राहू शकली व आपल्या आसेतु हिमाचल एकतेचा प्रत्यक्ष अनुभव घेऊ शकली.

उन्हाळ्याची सुटी संपवून ही मुलगी घरी परतली, तेव्हा तिच्याजवळ—अन् तिच्यासारख्या ५० विद्यार्थी-विद्यार्थिनींजवळ— एका सहलीच्या



**नवी दृश्ये, नवे चेहरे, नव्या जीवन-पद्धती.**

मधुर स्मृती आणि त्या जागृत ठेवणारे फोटो तर होतेच, पण आणखी काही तरी होते. अन् ते म्हणज स्वतःचे म्हणता येईल असे एक नवे घर, एक नवा पण जिव्हाळयाचा परिवार. थोडया दिवसांपूर्वीच अनोळखी असलेली पण आता 'आपली' झालेली माणसे जोडल्याचा एक अपूर्व आनंद.

दूर गावाचा प्रवास म्हटला, की तरुण मुलांची मने निसर्गतःच उत्सुकतेने उचंबळून येतात. त्यातून आपल्या अफाट देशात तर एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात प्रवास करणाऱ्याच्या समोर एक नवीन विश्व उलगडते. नवी दृश्ये, नवे चेहरे आणि नवीन जीवन–पद्धती मिळून एक नवीन साक्षात्कार होतो. पण या साक्षात्कारातही एक महत्त्वाची भर घालणे शक्य असते व ती म्हणजे 'एक्सपेरिमेंट' पद्धतीचा प्रवास. प्रवासाने होणाऱ्या भारत-परिचयात मौज असतेच, पण 'एक्स्पेरिमेंट' पद्धतीने केलेल्या या परिचयात विशेषच खुमारी असते. पण या खुमारीचा आनंद शक्य तेवढया अधिक भारतीय तरुण–तरुणींना मिळावा याच उद्देशाने 'आंतर-राष्ट्रीय जीवन–प्रयोग' संस्थेने आपल्या 'आंतर-भारतीय' कार्यक्रमाचा प्रारंभ केला.

या कार्यक्रमात भाग घेणारा तरुण आपल्या घरापासून बऱ्याच दूरच्या प्रांतात जातो. उदाहरणार्थ, दिल्लीहून मद्रासला किंवा गुजराथहून बंगालला. पण तिकडे गेल्यावर तो एखाद्या परकी पाहुण्यासारखा हॉटेलात उतरत नाही–एक घर त्याची वाट पाहत असते. त्याचे मुलासारखे स्वागत करायला एक परिवार सज्ज असतो. आपल्या नसलेल्या अन् तरीही आपल्या झालेल्या या घरात तो पाहुण्यासारखा राहत नाही, तर कुटुंबातला घटक म्हणून वावरतो ; कारण त्याला तो प्रदेश केवळ कॅमेऱ्याच्या भिंगातून पाहायचा नसतो, तेथल्या लोकांच्या दृष्टीतून पाहायचा असतो.

थोडक्यात म्हणजे, हा 'आंतर-भारतीय जीवनप्रयोगकर्ता' केवळ एका नवीन गावाला, नवीन प्रांताला भेट देत नाही, तर नवीन माणसे जोडतो, नवीन घर मिळवितो. हॉटेलातल्या नोंदवहीत सुरुवातीला सही करताना अन् शेवटी त्रयस्थ वृत्तीने बिल भरून खोली सोडताना त्याला हा अनुभव कधीच यायचा नाही.

सहलीचा हा भाग आकर्षक खराच, पण तितकाच आकर्षक दुसरा भाग म्हणजे त्या प्रदेशाचा शैक्षणिक दौरा. प्राचीन भारताचा सांस्कृतिक वारसा, अर्वाचीन भारताची औद्योगिक प्रगती आणि चिरंतन भारताची रमणीय स्थळे यांचा त्रिवेणी संगम अनुभवायला मिळेल अशी वेचक ठिकाणे या दौऱ्यात समाविष्ट केलेली असतात. एका कुटुंबातले जिव्हाळ्याचे वास्तव्य आणि निवडक स्थळांची शैक्षणिक सहल यांचा संगम होऊन हा तरुण प्रवासी आपल्या घरी परततो, तेव्हा एका दूरच्या भागाच्या क्षणदर्शनापेक्षा खूपच अधिक असे काही तरी त्याच्या पदरी पडलेले असते. तो मनाने काहीसा 'निराळा' होऊन येतो अन् आपल्या मनाचा एक कोपरा तेथे ठेवून येतो. या देवघेवीचे वर्णनच करायचे झाले तर तो म्हणेल—"माझ्या जीवनातला एक अविस्मरणीय प्रसंग."

हा आंतर-भारतीय कार्यक्रम मुख्यतः १४ ते २५ दरम्यानच्या वयातील मुला–मुलींसाठी आहे. मात्र वयात कोठल्याही भारतीय किशोर–किशोरीला आपल्या भारतीयत्वाचा 'चक्षुर्वैःसत्यम्' साक्षात्कार व्हायला हवा, नाही का? या वयातली मुली–मुले शाळा-कॉलेजांत जाणारी असतात, त्यामुळे साहजिकच ही योजना उन्हाळ्याच्या किंवा इतर लांबच्या सुटीत ठेवली जाते. प्रवासासाठी दहा-दहाचे जथ्थे करण्यात येतात. एकूण सहल तीन आठवड्यांची असते. अर्धा वेळ कुटुंबात वास्तव्य अन् अर्धा वेळ शैक्षणिक प्रवास. गेल्या तीन वर्षांत 'एक्स्पेरिमेंट'ने या योजनेप्रमाणे एकूण सुमारे ६० विद्यार्थी-विद्यार्थिनींचे सहा जथ्थे दिल्ली, मद्रास, काश्मीर, अहमदाबाद, लखनऊ, म्हैसूर, राजकोट आणि कलकत्ता या ठिकाणी इकडून तिकडे पाठविले. हा छोटासा आरंभ आहे, पण १९६८ साल संपायच्या आत आणखी २०-२२ जथ्थे भारताच्या एका टोकाहून दुसऱ्या टोकाला पाठविण्याचा 'एक्स्पेरिमेंट'चा संकल्प आहे.

'एक्स्पेरिमेंट'ची आंतर-भारतीय योजना म्हणजे एका आंतर-राष्ट्रीय कल्पनेचा राष्ट्रीय आविष्कार आहे. देशा-देशांतल्या सामान्य माणसांना एकमेकांच्या प्रत्यक्ष सहवासात आणून गैरसमजांचे धुके नष्ट करणे व सौहार्दाचे पूल बांधणे या ध्येयाला ही संस्था वाहिलेली आहे. 'माणसे एकत्र राहिली म्हणजे गुण्या-गोविंदाने कसे राहावे हे त्यांना कळते' या साध्या श्रद्धेवर 'एक्स्पेरिमेंट'च्या कार्याची उभारणी झालेली आहे ; अन् या श्रद्धेच्या बळावरच ३५ वर्षांपूर्वी जन्मलेल्या या संस्थेने आतापर्यंत सुमारे ३५ देशांतील एक लाखाहून अधिक तरुण-तरुणींना आंतर-राष्ट्रीय स्नेहसंबंधांचा अनोखा अनुभव मिळवून दिलेला आहे.

साता समुद्रापलीकडे एका अनोळखी कुटुंबात राहून येणाऱ्या 'एक्स्पेरिमेंट'-प्रवासी तरुणात आणि त्याच्या परदेशी कुटुंबियांत जे जिव्हाळ्याचे नाते जडते ते पाहिले म्हणजे अशी खात्री पटते की, राष्ट्रीय एकात्मतेची आजची आपली अत्यंत निकडीची गरज जर कोठली गोष्ट भागवू शकेल तर ती म्हणजे 'एक्स्पेरिमेंट'ची कल्पना. भाषा, कपडे, अन्न वगैरे वरकरणी भेदभाव सोडला तर काश्मिरी आणि केरळीय, मराठी आणि मद्रदेशीय यांच्यांत एक मौलिक एकात्मता आहे अन् ती कोठल्याही उथळ भेदभावापेक्षा अधिक स्थायी आहे याचा प्रत्यक्ष अनुभव उद्याच्या नागरिकांना आणून देणे हेच या आंतर-भारतीय योजनेचे उद्देश्य आहे. थोडक्यात म्हणजे हा एक 'राष्ट्रीय जीवन-प्रयोग' आहे. अन् तो यशस्वी होत आहे. सुटी पडली की दिल्लीच्या एका स्थापत्यशास्त्राच्या विद्यार्थ्याच्या मनात एकाच ठिकाणी जायचे विचार येतात मद्रास. 'आंतर-भारतीय योजने'च्या अगदी पहिल्या जथ्थ्यात तो गेला होता. त्याचा प्रयोग संपला आहे-पण त्याला दीड हजार मैल दूर मद्रासमध्ये एक "माझे घर" कायमचे मिळाले आहे. ○




# नाटक

---

माझं लग्न झालं अन् तेव्हापासून मी जवळजवळ चौपाटीवर जाणं सोडलं. फिरायला जायची वेळ आलीच तर मी अन् माझी बायको आपले शिवाजी पार्कात जातो. हा माझा नेहमीचा शिरस्ता.

तरीही मी आज चौपाटीवर आलो.

एकटाच......

चारच्या सुमारास. ही फिरायची वेळ नाही, हे मलाही माहीत आहे. तरीही मी आलो. ह्या उन्हात मी बंगल्यात पडून राहायला पाहिजे होतं, असं इतर लोक म्हणतील. तुम्हीही म्हणाल. मीसुद्धा एरवी राहतो. माझ्या बायकोनंसुद्धा हेच सांगितलं, अन् मुलगीही बोबडया शब्दांत तेच म्हणाली. अन् तरीही मी बाहेर पडलो. चौपाटीवर आलो. नेहमीचा नियम मोडून.

एकटाच......

मला जर ह्या स्थितीत कुणी पाहिलं असतं तर त्यानं मला नक्कीच 'विचारा' म्हटलं असतं. पण मी अजिबात बिचारा नाही. मोठासा स्वतःचा बंगला आहे. छानशी बायको आहे. गोडशी मुलगी आहे. बायको आणि मी तरुण आहोत. खेळाडू, हौशी आहोत. आमचं एकमेकांवर नितांत प्रेम आहे. तरीसुद्धा न ऐकता आज मी चौपाटीवर आलो.

एकटा......

कधीकधी दिवस उगवतो एखाद्या धोब्यासारखा. अवचित अस्वस्थतेचे कपडे घेऊन. मन ते पांघरते. विचार भरकटतात काटलेल्या पतंगाप्रमाणं. कसंनुसं होतं. काही सुचत नाही. सुटीचा दिवस खराब होतो.

माझंही आज तसंच झालं. उठल्यापासून मी अस्वस्थ होतो. उगाचच. बायको अन् मुलगी आनंदात होती, कारण आज माझ्या मुलीचा वाढदिवस होता. मी मात्र हे पाहत होतो अन् नव्हतोही. त्यांच्यांत समरस होत होतो पण तसाच वेगळाही पडत होतो. ही मनाची लपवाछपव मला जास्त सहन झाली नाही म्हणून कसेतरी कपडे केले. कसातरी बाहेर पडलो. कुठेतरी चालत गेलो. अन् थांबलो तेव्हा कळलं, मी चौपाटीवर आहे.

एकटाच......

# अनंत भालेराव

उभे राहून पाय दुखले म्हणून मी बसलो. समुद्राची विशालता मन भारून गेली. मनावरचा ताण सैल झाला. लाटांकडे पाहताना मजा वाटू लागली. खारा वारा मन सुखावू लागला.

किती तरी वेळ मी तसाच बसून होतो.

घड्याळ बघितले. बापरे ! सहा.

मीनाचा वाढदिवस. लवकर गेलं पाहिजे. तिला काय हवंय? मोठी बाहुली ! हसणारी. डोळे फिरवणारी.

मी उठलो.

थोडं अंतर चाललो. झाडाच्या सावलीत ती पाठमोरी आकृती पाहून. ओळखीची वाटली. ही तर नंदा. लांब केस. एक शेपटा. अबोलीची वेणी. विचारावं का पुढे होऊन...ओळखेल ? ...बोलेल ? ...का नुसतंच हसेल... लग्न झालंय तिचं...तेव्हा...विचारावंच. मी पुढे झालो.

"Excuse me. आपण नंदा सबनीस का ?"

"अं ! हो !" दचकली. बावरली. सावरून म्हणाली, "पण आपण ?"

"मी निशिकांत देशपांडे !" हसत म्हणालो.

आश्चर्यानं तिचे नेत्र विस्फारले.



आनद तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट होत होता.

"अय्या ! निशी तू ?"

"हो. एवढं आश्चर्य ! "

"नाही तर काय ? किती दिवसांनी भेटतो आपण."

"हं ! पण ओळखलं नाहीस ?"

"कशी ओळखेन."

"का ?"

"फार बदललास तू !"

"तू मात्र तशीच आहेस. तेच केस, तोच बांधा !"

"पुरे पुरे ! भेटल्याबरोबर एवढी स्तुती नको म्हटलं."

"बरं ! उभा राहूनच का बोलणार आहेस ? बसू या. चला ना ?"

योग्य ते अंतर राखून आम्ही बसलो. खूप बोलावंसं वाटत होतं. विचारावंसं वाटत होतं. तरीसुद्धा दोघेही मुकेच होतो. मीच म्हणालो,

"कशी आहेस ?'

"कशी वाटते ?"

"छान ! सुखी असावीस असं दिसतंय."

"हो ना ! अगदी बरोबर ! खूप सुखी आहे. हे इंजिनीयर आहेत. झालं तर पुण्याला आमचा वाडा आहे. दोन गोड मुलं आहेत. सुख म्हणजे तरी आणखी काय निशी ?"

तिनं आपल्या संसाराचं सुखी समीकरण माझ्यापुढं मांडलं. मला मनातून खरो-खर वाईट वाटलं. खरं म्हणजे ती मला दुःखी असायला हवी होती. पण मी वर-करणी म्हणालो,

"फार बरं वाटलं ऐकून."

तिचा चेहरा फुलला.

"चार वर्षांत दोन मुलं ! बरीच प्रगती......"

"चल्ल ! चावट आहेस, तसाच !"

ती तोंडभर हसत म्हणाली. मीही हसलो.

"तू कसा आहेस ?"

"कसा वाटतो ?"

"माझ्यासारखाच. सुखी, आनंदी."

"माझं भाग्य एवढं मोठं नाही नंदा !"

मी स्वरांत उगाचच कातरता आणतो.

ती भावनेनं भारावते.

"नोकरीला कुठं......"

" सचिवालयात."

" मोठा जॉब असेल."

" छ्या, सिंपल क्लार्क !"

" पण B. A. ला क्लास मिळूनसुद्धा......"

" ह्या ! अग, मी B. A. झालोच नाही."

" पण मी तर ऐकलं की......"

" अग ! ज्युनियरच्यानंतर कॉलेज सोडलं मी !"

" का ?"

" तुला माहित्येय मला वाटलं !"

ती चपापली. विषय वदलून ती म्हणाली,

" राहतोस कुठं ?"

" तिथंच. चाळीत."

" लग्न वगैरे......"

" छे ! अग, देणार कोण आम्हांला मुलगी नंदा; ना शिक्षण, ना पैसा......"

" असं का म्हणतोस ! मनात आणलंस तर M. A. सुद्धा होशील. कविता वगैरे' करतोस......"

" कविता ? हॉं ! हॉं ! हॉं !" मी जोरात हसलो. " कविता करण्यासाठी कोण आहे माझ्या जीवनात ? एक तू होतीस. तेव्हा जमत होतं. नंदा......"

तिचे डोळे पाणावतात. मला न कळेल अशा बेतानं ती ते पुसते. पण मला कळत तिनं कसलातरी निश्चय केल्याचा अभिनय मी तिच्या डोळ्यांवरून ओळखतो. कदाचित माझ्यासारखं नाटक—

" पण तू गेलीस अन् माझ्या जीवनात वसंत काही बहरलाच नाही."

" पण निशी, हे विसरायला हवं."

" काय ? तुला विसरू नंदा ? माझं विश्व, माझं सर्वस्व होतीस तू नंदा. तुला विसरणं कसं शक्य आहे ? तू विसरलीस मला ?"

" अं ! अं ! नाही ! पण प्रयत्न आहे !"

" सफल होईल असं वाटतं ?"

" व्हावा अशी इच्छा आहे."

" का ?

" तुला कल्पना नाही येणार निशी. माझ्या मनाची किती कुरतओढ होते याची ? एखाद्या संध्याकाळी अगदी बेचैन व्हायला होतं. [तुझी, पूर्वीची, आपल्या भेटींची आठवण होते. मग मी संसार विसरते. घर विसरते. माझ्यासमोर तू असतोस. माझा हात हातात घेतोस. मी लाजते. माझ्या लावण्यावर तू कविता करतोस. मी चूर होते. तू मला मिठीत घेतोस. सारं जग विसरते मी. मधेच आवाजानं दचकते. मुलगा

रडत असतो. कधी कधी हे विचारतात,

'अशी बेचैन का ?'

'अं ! कुठे, काही नाही.'

'नाही कसं ! सकाळपासून पाहतोय ! काहीतरी बिघडल्यासारखी वागत्येस!

'नाही हो जरा अंग मोडून आलंय.'

'मग पडून राहा.'

त्यांच्या भोळ्या प्रेमानं मी भारावते निशी. त्यांच्या प्रेमाशी एकरूप होण्यासाठीच तुला विसरावं लागेल."

"मग ! विसर की !"

"तसं नाही. आज मी सुखात. तू तसाच मला हे डाचत राहील."

"मग मी काय करू ?"

"ऐकशील ?"

"जमलं तर."

"न जमायला काय झालं ?"

"सांग तर खरं !"

"लग्न ?"

एखादा बाँबगोळा पडल्यासारखं त्याला वाटतं.

"लग्न ?"

"का ? एवढा दचकलास ?"

"नंदा, पण कसं शक्य..."

"का नाही ? माझ्याशी करणार होतास ना ? तसंच... !"

"तूच बोलतेस हे नंदा. आठवतं तुला ?"

"काय ?"

"तुझ्यासमोर दुसऱ्या कुठल्या मुलीचं वर्णनसुद्धा केलेलं खपायचं नाही तुला. रागवायचीस. रुसायचीच. तुझी समजूत काढताना नाकी नऊ यायचे माझ्या; अन् तूच मला सांगतेस. लग्न कर. दुसरीशी. नंदा, तुझ्याशिवाय माझ्या हृदयात कुणालाही स्थान नाही."

तिला वाईट वाटतं. काहीतरी चूक घडल्यासारखं वाटतं. आपल्या स्वार्थीपणाचा तिला राग येतो.

"तसं नाही निशी. तुला आठवतं तू म्हणायचास ! नंदा, तुला सुखी ठेवण्याकरिता वाटेल ते कष्ट करण्याची माझी तयारी आहे. माझं जीवन, सर्वस्व, विश्व तूच आहेस नंदा. तुझ्याकरिताच जगावं अन् तुझ्या मांडीवर डोकं ठेवून प्राण... !" पुढचं तिला म्हणता येत नाही. तिचा कंठ दाटून येतो.

"निशी, तुला मी सुखी पाहिजे ना !"

" अलबत्, नंदा !"

" मग मला वचन दे. "

सूर्य बुडत असतो. आकाशात गुलाल उधळल्यासारखं वाटतं. त्याची लाली पाण्यावर तरंगताना दिसते.

" मला वचन हवंय, निशी. "

" कसलं ?"

" तू लग्न करशील ?"

मी कचरतो. वातावरणाच्या गंभीरतेचा माझ्या मनावर नाही म्हटलं तरी परिणाम झालेला असतो.

तिच्या हे लक्षात येतं. स्फुंदत ती म्हणते, " मला वाटलं निशी, माझ्याकरिता एवढंतरी करील ? पण..."

" हे काय नंदा ! रडतेस ? "

" मग काय करू ?"

" डोळे पूस बघू. अन् हे घे वचन. "

चॉकलेटची वडी ठेवावी त्या सहजतेनं तिला मी वचन देतो. सहजतेनं ती घेते. दोघांनाही बरं वाटतं.


काय बोलावं हा दोघांपुढे प्रश्न असतो. मग ती माझं लग्न ठरवायला निघते.

" निशी ?"

" हं !"

" मुलगी कशी हवीय तुला ?"

" तुझ्यासारखी !"




प्रवेश-पत्रिका रविवारच्या नवशक्तीमध्ये पाहा.

लिट्क्विझ वीक्लीचा अंक मोफत मागवा.

**लिट्क्विझ प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई ७**

" नीट सांग हं !"

" अग, एका कारकुनाची बायको कशी असणार ? "

" हे रे काय ? सांग ना ?"

" कशीही ? घरकाम करून मला दोन वेळा गिळायला घालणारी. "

" पाहुण्यातली आहे ?"

" तसं नाही पण सहज विचारलं. "

दोघेही परत गप्प बसतात. कसं बोलावं, कुठच्या विषयावर, दोघांनाही कळत नाही. वेळ जात असतो. अंधार दाटत असतो.

" उठू या नंदा ! अंधार पडलाय."

तिला वाटलं उठताना तो हात देईल पूर्वीसारखा. तो उठतो अन् चालू लागतो. ती मागे येते.

" पुन्हा केव्हा भेटशील ?"

" ठरवून आपल्या भेटी कशा होतील आता ?"

" घरी येना ! ओळख करून देईन ह्यांच्याशी. "

मग रस्त्यावरच्या दुकानातून तो बिस्किटाचा पुडा घेतो.

" हे घे !"

" कशाला ?"

" अग, मुलांना खाऊ ? सांग म्हणावं तुमचा मामा भेटला होता."

तो निघतो. लांब ढेंगा टाकीत पुढे जातो.

ती पाहत राहते. तिला वाईट वाटते. डोळ्यांतून टिपं ओघळू लागतात. त्याला फसवल्याबद्दल. त्याच्या भोळेपणाचं, प्रेमाचं कौतुक वाटतं. तिला वाटतं, पळत जावं अन सांगावं, " निशी, नाही रे ! मी सुखी नाही. श्रीमंत व्यसनाधीन बदफैली नवऱ्याची मी बायको आहे नावाला. "

ती हळूहळू पावलं टाकीत चालू लागते.

आठवणींचं गाठोडं घेऊन...

तो मात्र पुढे जातो. त्याला भान नसतं. मीना...वाढदिवस...प्रेझेंट...त्याच चक्रात तो अडकतो. क्षणापूर्वी एखाद्या नाटकातील विरही नायकासारखे संवाद आपण बोललो याचं त्याला विस्मरण होतं.

ब्लॉकची कॉलबेल दाबतो.

पत्नी दार उघडते. सजलेली. सुंदर. तो प्रसन्न होतो. तिचं एक गोडसं चुंबन घेतो. ती लटकं रागावते.

तो हसतो. सुखानं. आनंदानं.

O

# कायदा गाढव आहे ?

कायदा गाढव असतो असे आपण अनेकदा म्हणतो आणि आजच्या युगात प्रत्येक अडलेल्या हरीला केव्हा ना केव्हा या गाढवाचे पाय धरावेच लागतात. आज अशी पाळी काही डॉक्टरांच्यावर आलेली आहे.

त्याचे असे आहे, हार्ट ट्रान्सप्लान्टेशनच्या बातम्या आपण वृत्तपत्रांत अनेकदा वाचतो. या हृदय बदलण्याच्या प्रयोगात डॉक्टर यशस्वी होतात की नाहीत, हे आपणांस लवकरच कळेल. पण उद्या एखाद्या हृदय बदलणाऱ्या डॉक्टरला खुनाच्या आरोपावरून कोर्टात उभे राहावे लागेल. आणि कुणी सांगावे, अशा वेळी त्या डॉक्टरचे मात्र हृदयपरिवर्तन होऊन ही शस्त्रक्रिया करून आपण घोडचूक केली म्हणून तो मान्य करील.

अशा स्वरूपाच्या खटल्यांत उपस्थित होणारे प्रश्न अनेक स्वरूपाचे आहेत. काही प्रश्न कायद्याचे आहेत. काही भावनात्मक आहेत. या प्रश्नांच्या उत्तरावर विज्ञानाची प्रगती अवलंबून आहे, त्याचप्रमाणे मूलभूत व्यक्तिस्वातंत्र्य पण अवलंबून आहे. अगदी वर वर उपस्थित होणारा पहिला प्रश्न असा आहे. समजा, एखाद्या रोग्याला तुम्ही नवे हृदय बसविलेत आणि तो वीस दिवसांत मरण पावला, तर डॉक्टरने एका अर्थाने त्याचा खूनच केला नाही का ?– डॉक्टरने हे ऑपरेशन केले

दत्तप्रसाद दाभोलकर

नसते तर तो रोगी वीस दिवसही जगू शकला नसता, असे जर डॉक्टरांना सिद्ध करता येत नसेल तर तो खूनच आहे असं मत एडवर्ड पेसिन या प्रख्यात अमेरिकन कायदेपंडितानं व्यक्त केलंय. तो म्हणतो हृदय बदलणे म्हणजे काही साधी शस्त्रक्रिया नव्हे. एखाद्या साध्या शस्त्रक्रियेत डॉक्टर रोग्याचे एखादे फुफ्फुस वा पाय कापून काढू शकतात. कारण त्या अवयवांशिवाय रोगी जगू शकतो हे विज्ञानाला मान्य आहे. पण एखाद्या माणसाचे हृदय काढून ते नवे बसविण्याचा डॉक्टरला काय अधिकार आहे ? डॉक्टरसमोरचा रोगी म्हणजे काही प्रयोगशाळेतले जनावर नव्हे. रोगी दगावला तर सारी जबाबदारी डॉक्टरची आहे !

याच संदर्भात त्यांनी दक्षिण आफ्रिकेत झालेली पहिली हृदय शस्त्रक्रिया पुढे मांडली आहे. या शस्त्रक्रियेत एका पंचवीस वर्षे वयाच्या तरुणीचे हृदय एका रोग्याला बसविले. त्या रोग्याची छाती उघडून ती शस्त्रक्रियेला तयार करण्यास जवळजवळ चार तास लागले. तेवढा वेळ त्या तरुणीचे हृदय थंड रक्तात बुडवून ठेवले होते. एडवर्ड पेसिन म्हणतो, " त्या चार तासांत त्या तरुणीचे हृदय कमजोर बनले नाही हे तुम्ही कशाच्या जोरावर सिद्ध करणार आहात ? "

या साऱ्या प्रश्नांवर डॉक्टरलोकही एक प्रश्न विचारतात. ते म्हणतात, असे प्रयोग केले नाहीत तर विज्ञानाची प्रगती कशी होणार ? एकट्या अमेरिकेत हृदय रोगाने दरसाल पाच लाख लोक मरण पावतात. त्यांना तुम्ही असेच मरावयास देणार आहात काय ? आणि डॉक्टरांच्या या प्रश्नानंतर हा प्रश्न काहीसा नैतिक होतो. विज्ञानाच्या प्रगतीसाठी तुम्ही किती किंमत देणार, असा हा सवाल आहे. आणि अशा वेळी पेसिनचे म्हणणे मला अधिक बरोबर वाटते. सल्फानिल अमाईडसारख्या साध्या औषधाचे उदाहरण घ्या. हे औषध मिळाले तेव्हा रसायनशास्त्रज्ञांना आनंद झाला. त्यांनी थोडे प्रयोग केले आणि ते लगेच माणसांना द्यावयास सुरुवात केली. सल्फानिल अमाईड विषारी नव्हते हे नक्की. पण सल्फानिल अमाईड पाण्यात विरघळत नव्हते. रसायनशास्त्रज्ञांनी ते एथिलीन ग्लायकॉलमध्ये विरघळवून नंतर ते रोग्यांना दिले. एथिलीन ग्लायकॉल पण विषारी नव्हते. पण रोग्याच्या शरीरात एथिलीन ग्लायकॉलचे 'ऑक्झॅलिक ॲसिड 'मध्ये रूपांतर झाले. शेकडो रोगी मरण पावले. प्रथम प्राण्यांच्यावर प्रयोग केले असते तर या लोकांचे प्राण वाचले असते. औषधाच्याबाबत आज अशा स्वरूपाचा कायदा आहे. शस्त्रक्रियेबाबतही अशाच स्वरूपाचा कायदा नको का ? प्रसिद्धीच्या मागे लागून डॉक्टर उगाच संपूर्ण शास्त्र विकसित होण्यापूर्वी तर शस्त्रक्रिया करत नसतील ना ?

— पण हा प्रश्न तसा लवकरच सुटेल. बहुसंख्य शस्त्रक्रिया यशस्वी होत असतील तरच रोगी अशा शस्त्रक्रियेला तयार होतील. अन्यथा, या शस्त्रक्रियेमागचे वलय आणि या शस्त्रक्रिया हळूहळू नाहीशा होतील.

पण समजा, या शस्त्रक्रिया यशस्वी होत गेल्या तर ? — तर मात्र एक बिकट

कायदेशीर प्रश्न निर्माण होईल. हा प्रश्न असा आहे : एखादा रोगी मरण पावला असे समजून तुम्ही त्या माणसाचे हृदय काढून दुसऱ्याला लावता. पण त्या माणसाचे हृदय जर चालू स्थितीत आहे तर तो माणूस मरण पावला असे तुम्ही कशाच्या जोरावर म्हणता ? मरण आणि जीवन यांच्या नक्की व्याख्या कोणत्या ? काही वर्षांपूर्वी माणसाच्या हृदयाचे ठोके बंद पडले की तुम्ही त्या माणसाला मृत समजत होता. पण आज ते ठोके बहुधा पुन्हा सुरू करता येतात. त्याच्याही पूर्वी श्वासोच्छ्वास बंद झाला, की तुम्ही माणसाला निकालात काढत होता. आज कृत्रिम रीतीने श्वासोच्छ्वास सुरू करता येतो. आज एखाद्या माणसाचे हृदय चालू स्थितीत असताना तो माणूस मरण पावला असे तुम्ही म्हणू शकाल का ? **अशा वेळी त्या माणसाचे हृदय काढून ते दुसऱ्याला लावण्यात, असहाय्य संवेदनाविरहित माणसावर अन्याय नाही का** ? तुम्ही म्हणाल त्या माणसानेच शुद्धीवर असताना अशा अवस्थेत आपले हृदय दुसऱ्याला बसवावे म्हणून लिहून ठेवले असले म्हणजे झाले ! पण वकील म्हणतात त्यालाही हरकत आहे. ती एका अर्थाने आत्महत्या आहे; आणि कायदा त्याला परवानगी देऊ शकत नाही.

आता प्रत्येक वेळी रोगी जिवंत आहे का मेला आहे, हे ठरवायला तज्ज्ञांची कमिटी नेमावयाची तर कठीण आहे. त्यात इतका वेळ जाईल, की तोपर्यंत तो अवयव वापरावयास निरुपयोगी होऊन जाईल. या प्रश्नावर काही डॉक्टरांनी अक्कल हुशारीने एक तोडगा सुचविला आहे. ते डॉक्टर म्हणतात, माणसाच्या मेंदूची विद्युतशक्ती संपली की, रोगी मरण पावला असे ठरवावे. पण हा तोडगा बराचसा आपल्या केंद्र सरकारच्या तोडग्यासारखा आहे. त्याने मूळ प्रश्न तर सुटत नाहीच; पण चार नवे प्रश्न मात्र निर्माण होतात !

कारण, पुष्कळदा माणूस रूढ अर्थाने मरण पावल्यावर प्रथम त्याचे हृदय निरुपयोगी होते आणि नंतर त्याच्या मेंदूची विद्युतशक्ती थांबते. अशा वेळी डॉक्टर त्याचे हृदय वापरू शकत नाहीत. पुन्हा दुसरा एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. आज हृदय बदलणारे डॉक्टर उद्या माणसाचा मेंदू पण बदलणार आहेत. एका प्राण्यावर मेंदू बदलण्याची शस्त्रक्रिया झालेली आहे. आणि ती शस्त्रक्रिया प्रयोगावस्थेत यशस्वी ठरली आहे. पण एकदा का मृत्यूची ही नवी व्याख्या मान्य झाली, की माणसाचा मेंदू बदलणे शक्य होणार नाही.

आणि जेव्हा केव्हा माणसाचा मेंदू बदलणारी शस्त्रक्रिया होईल तेव्हा तर अनेक प्रश्न निर्माण होतील. मानवी कायदा, मानवी भावना यांचा पायाच कदाचित उखडला जाईल. कारण माणसाच्या मेंदूत त्याची स्मृती, त्याची बुद्धिमत्ता साठवलेली असते. निदान आपण आज तसे मानतो. आता एखाद्या बाईचा मेंदू काढून तुम्ही तो दुसऱ्या बाईला बसविलात, आणि इकडे तो मेंदू पहिल्या बाईच्या मुलावर आणि नवऱ्यावरच प्रेम करीत राहिला तर तुम्ही काय करणार ? एखाद्या नेकीने वाग-

णाऱ्या माणसावर तुम्ही गुन्हेगाराचा मेंदू बसविलात आणि त्याने गुन्हा केला तर तुम्ही शिक्षा कोणाला करणार ? त्या प्रथम नेकीने वागणाऱ्या माणसाला शारीरिक शिक्षा करण्याचा अधिकार न्यायालयाला असावा का ? आणि समजा, कदाचित माणसाच्या रक्ताचा प्रवाह, त्याच्या ग्रंथी, याचा परिणाम मेंदूवर आणि त्याच्या कार्यावर होत असेल तर तुम्ही काय कराल ? एखादी प्रमुख व्यक्ती मरण पावली आणि तिला नवा मेंदू बसवावयाचा असेल अशा वेळी असा मेंदू उपलब्ध नसेल, तर समोरचा एखादा मामुली नागरीक मारून त्याचा मेंदू तुम्ही वापरू शकाल का ? प्रमुख व्यक्ती आणि मामुली नागरीक यांची कोणती व्याख्या तुम्ही करणार आहात ? आणि निपराध नागरिकाला मारणे बेकायदेशीर आहे म्हणून आईनस्टाइन-सारख्या मानवजातीतल्या महान शास्त्रज्ञाला आपण मरावयास देणार का ? — या साऱ्या प्रश्नांची उत्तरे शेवटी आपण सर्वांनीच द्यावयाची आहेत. कारण, कायदा शेवटी तुम्ही आम्ही मान्यता दिली तरच कायदा बनतो.

बाकी शास्त्रज्ञ मात्र या साऱ्या प्रश्नांनी थोडे वैतागलेले आहेत. मेंदूची शस्त्र-क्रिया झाल्यावर काही वेळा मेंदू नव्या शरीरावर हुकमत गाजवील. केव्हा केव्हा नवे शरीर मेंदूवर हुकमत गाजवेल. पूर्वी एका गोष्टीत, खरी आई आणि खोटी आई 'मूल माझे आहे' म्हणून भांडत राजासमोर गेली होती. हुशार राजाने त्या बायांना योग्य दिला होता. पण उद्या एखाद्या मुलाचा मेंदू बदलल्यावर असाच वाद झाला तर ? शक्यता आहे. या भावनात्मक संघर्षाला कारणीभूत झाल्याबद्दल शस्त्र-क्रिया करणाऱ्या डॉक्टरलाच तुरुंगात जावे लागेल ! निदान रथ विन्टरसारख्या शास्त्रीय लेखकाला तसे वाटते.

## शुभं करोति : पृष्ठ २३ वरून

कोणते ? सांग ना. तुला आठवते ? एकदा तू मला भेटला होतास तेव्हा तुझ्या हाती एक इंग्रजी पुस्तक होते....तू ते मला दिलेस. म्हणालास, हे वाच. अभिनयाच्या तंत्राविषयी यात तिकडल्या मोठमोठ्या नटनटींनी आपले म्हणणे मांडले आहे.... एकूण पुस्तकाविषयीच नफरत असलेल्या मी ते पुस्तक उगीचच घेतले. रात्री उगीचच झोपाळल्या डोळ्यांनी चाळले. एकच वाक्य डोक्यात शिरले....ते मात्र पक्के.

उषा बोलू लागते, माझे अभिनयाचे तंत्र एका वाक्यात सांगता येईल....

(क्रमशः)

## "सारे जग श्वास रोखून बसेल"

असे बेगुमानपणे सांगणाऱ्या हिटलरच्या

झंझावाती पुरुषार्थाची कहाणी

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये फक्त

# अरुंदेल बेटावरचा वृकमानव

माझे ऐका. आपण वनविहाराला निघालेलो नाही. जीवनमरणाचा प्रश्न उभा राहिला आहे. माझी आशा धरू नका. मी फार काळ जगणार नाही. तुम्ही किनारपटी न सोडता चालायला लागा. एका तराफ्याच्या सहाय्याने इथून सुटण्याचा तुम्ही प्रयत्न जरूर करू शकाल. शकाल नाही कराच......

अनंत
भावे

जुलै ६–१९४३ मध्ये सॉलोमन्स बेटे रात्रीच्या गडद अंधारात वेढलेली होती. भोवतालचा समुद्र अत्यंत निश्चल होता. वातावरणात सर्वत्र गुदमरवून टाकणारा उकाडा भरून राहिला होता. आकाश ढगांनी अधिकच काळे वाटत होते. ते जणू काही थोडे वाकले आहे असा आभास होत होता. चढाईसाठी अगदी आदर्श रात्र होती ती.

किनाऱ्यापासून दूर, अमेरिकन विनाशिकांनी जपान्यांच्या ताब्यात असलेल्या न्यू जॉर्जिया बेटावर तोफा डागल्या होत्या. तोफमाऱ्यानंतर बेटावर चढाई करणाऱ्या सैनिकांना पाण्यात उतरण्यासाठी विनाशिकांवरून खाली जाळी टाकलेली होती.

' स्ट्राँग ' नावाच्या विनाशिकेवर लेफ्टनंट ह्यू बार मिलर न्यू जॉर्जिया बेटाकडे पाहत डेकवर उभा होता. तेथे उभा राहून प्रचारकाचे सैनिकांना चेतना देणारे प्रभावी पण यांत्रिक भाषण तो ऐकत होता. प्रचारक आवेशाने म्हणत होता:— 'शत्रूच्या ताब्यात असलेल्या बेटांची मालिका जिंकून घेण्याच्या आपल्या मोहिमेतील दुसऱ्या टप्प्याला आज सुरुवात होत आहे. तुम्हांला माहीतच आहे की, या द्वीपसमूहाच्या दक्षिणेकडील बेटांमधून आणि गोडॉलकॅनॉलमधून शत्रूला आपण हुसकून लावले आहे. परंतु आपल्या मोहिमेचे अंतिम लक्ष्य खुद्द जपानवरच धडक देणे हे आहे. आणि सॉलोमन्समध्ये जपान्यांना आपण पराभूत केले तर पुढचा मार्ग अग-

दीच सोपा आहे, हे लक्षात ठेवा आणि निकराने लढा. सॉलोमन्स बेटे आपण लौकरात लौकर ताब्यात घेऊ या. मी तुम्हांला सुयश चिंतितो.'

ध्वनिक्षेपकामधील आवाज थांबला. सैनिकांनी आपापल्या जागा धरल्या आणि ते हुकमाची वाट पाहू लागले. लेफ्टनंट मिलर त्याच्याभोवती असलेल्या पाच-सात सैनिकांशी बातचीत करीत होता. इतक्यात एका विध्वंसक जपानी टॉर्पेडोने विनाशिकेला प्रचंड धडक मारली. क्षणार्धात वातावरण बदलले. विनाशिकेवर नुसता हलकल्लोळ उडाला. एकामागून एक झालेल्या स्फोटांत तिची शकले उडाली आणि दोन मिनिटांपूर्वी दिमाखात पाण्यावर उभी असलेली ही मजबूत विनाशिका वेगाने, केविलवाणेपणे त्याच्याखाली गेली. ती बुडाली त्या जागी सांडलेले तेलाचे पुंजके पेटून पाण्यावर जळत होते. पाणी वेडेवाकडे घुसळण घालीत होते. त्या पाण्यात कोठल्या तरी फळीच्या आधाराने मिलर तरंगत होता. त्याचबरोबर आणखी पाच जणांनी ती फळी जीवाच्या आकांताने पकडली होती. बोटीच्या शोकांतिकेचे स्थळ हळूहळू दूर होऊ लागले. असे तब्बल चार दिवस गेले. फळीचा आधार घेणाऱ्यांमध्ये तीन माणसे आगीत होरपळलेली होती. त्यांना जखमा झाल्या होत्या, आणि अन्नपाण्याविना असहाय्यपणे तरंगणाऱ्या त्यांच्या शरीरांना सूर्याचे प्रखर किरण भाजून काढीत होते. दुसरे दोघे पार बेशुद्धीत होते. ते मृत्युपंथाला लागले होते. मिलरचे स्वतःचे सारे शरीर वेदनांनी ठणकत होते. पण तो एकटाच थोडासा सावध होता.

त्या सर्वांनी जीव वाचण्याची आशा सोडून दिली होती. तितक्यात पश्चिम क्षितिजावर त्यांना भूमिदर्शन झाले. भर दुपारी, समुद्रातील लहरी-प्रवाहांनी ढकलत त्यांना या भूमिपाशी आणून सोडले. वाळूला पाय लागले आणि शक्तिहीन अवस्थेत ते तेथेच कोसळले. काही वेळानंतर मिलरने त्या तिघांच्या मदतीने बेशुद्ध झालेल्या दोघाजणांना मोठ्या कष्टाने कोरड्या वाळूत आणले. तेथे पुन्हा सर्वांनी विश्रांती घेतली आणि नंतर रांगत रांगत जाऊन किनाऱ्यावरील झुडपांचा आश्रय घेतला.

## धीर कशाला सोडता ?

संध्याकाळी मिलर जागा झाला तेव्हा बेशुद्ध असलेले दोघेजण मरण पावले होते.

"आपण या दोघांना मूठमाती देऊ," मिलर म्हणाला. "मात्र अगोदर जी उपयोगी पडेल ती त्यांच्याकडील प्रत्येक वस्तू काढून घेतली पाहिजे आपण."

"लेफ्टनंटसाहेब, आपण कुठं आहोत अशी तुमची कल्पना आहे ?" फ्रँक मॅचिन्स्कीने विचारले, "आणि आपल्याला कुठं आणि किती जायचं आहे ?"

मिलरने मान हलवली. तो म्हणाला, "मला निश्चित काहीच सांगता येणार नाही. कदाचित आपण कोलोम्बांगारा इथं वाहत आलो असू किंवा त्याच्या आणि न्यू जॉर्जियाच्यामध्ये कुठंतरी असलेल्या अरुंदेल बेटावरती. जर हे अरुंदेल बेट असेल तर ते लक्षण काही ठीक नाही. हे बेट जपान्यांच्या ताब्यात आहे."

“ मग काय करायचं आपण ?” चौघांमध्ये सर्वांत तरुण असणाऱ्या मुलाने काकुळतीने प्रश्न विचारला, “ आपल्याकडे अन्न नाही. शस्त्रास्त्रं नाहीत. काही नाही ! ”

“ नसेल काही. पण आत्ताच धीर कशाला सोडायला हवा ?” मिलरने आपल्या अधिकारी आवाजात म्हटले, “ जर आपल्याला खायला हवं असेल तर प्रथम एक गोष्ट केली पाहिजे. ही जागा सोडून जिथं काही नारळ वा इतर खाण्यासारखी फळं मिळू शकतील तिकडे गेलं पाहिजे. निघूयाच आपण तिकडे. मात्र गटापासून एकटे पडू नका, आणि अत्यंत सावध राहा. ”

मृत्यू पावलेल्या आपल्या दोन सहकाऱ्यांना मूठमाती देऊन मिलर आणि त्याचे दोस्त किनाऱ्यावरील जंगलाकडे निघाले. जेमतेम शंभर-दीडशे पावले ते चालले असतील इतक्यात मिलर अकस्मात थांबला. त्याच्या शरीरातील वेदना पुन्हा सुरू झाल्या होत्या. आणि त्या सहन करणे आपल्या शक्तीबाहेरचे आहे असे त्याला वाटू लागले होते. मध्येच त्याला एक रक्ताची उलटी झाली. त्यासरशी देहातील सारी धारक शक्ती संपुष्टात आल्यासारखा तो खाली कोसळला.

## मिलरचे नंदनवन

स्वतःला कसेबसे सावरून मिलर आपल्या दोस्तांना म्हणाला, “ माफ करा दोस्त, मला वाटत होतं त्यापेक्षा जबरदस्त असं काहीतरी झालं असलं पाहिजे मला. मला वाटतं, मला सोडूनच आता जावं लागेल तुम्हांला. ”

मिलरच्या सहकाऱ्यांनी कुरकूर करून पाहिले; पण मिलरने त्यांना लगेच गप्प केले. तो म्हणाला, “ माझं ऐका. आपण वनविहाराला नाही निघालेलो. जीवन-मरणाचा प्रश्न उभा राहिलेला आहे इथं. माझी आशा धरू नका. मी फार काळ जगेन असं मला वाटत नाही. पण तुम्ही अजून तंदुरुस्त आहात. थोडं अन्न पोटात गेलं म्हणजे चांगलीच हुशारी वाटेल तुम्हांला. इतकंच नव्हे तर या बेटावरून निसटूनसुद्धा जाता येईल. असं करा, किनारपट्टी न सोडता चालत राहा. जर मी मघाशी म्हटल्याप्रमाणं हे अरुंदेल बेटच असेल तर त्याच्या पश्चिम टोकावरून न्यू जॉर्जिया बेट दिसेल तुम्हांला. खाण्याच्या पदार्थांचा साठा करून एखाद्या तराफ्याच्या साहाय्याने न्यू जॉर्जियाला जाण्याचा प्रयत्न तुम्ही जरूर करू शकाल. शकाल नाही कराच. मी तुम्हांला सुयश चिंतितो. ”...मिलरने आपल्या पायांतले बूट काढले. ते बूट, अंगातील सदरा आणि पावसाळी कोट या वस्तू त्याने दोस्तांच्या हवाली करीत म्हटले, “ या घ्या तुम्ही. मला त्यांची जरुरी लागणार नाही. ”

“ आणि लेफ्टनंटसाहेब, तुमचं काय होणार ?” मॅचिन्स्कीने कळवळून विचारले.

“ माझं ? माझं काय होणार ?” मिलर शांतपणे उत्तरला, “ आपले निवृत्तीचे दिवस अशाच एखाद्या एकाकी बेटावर घालवायची माझी फार इच्छा होती. नंदन-वनाची माझी कल्पनाच मुळी तशी आहे. बरं झालं. अपेक्षेपेक्षा लौकरच माझं

नंदनवन मला सापडलं. गंमत आहे. चला आता. निघा तुम्ही इथून. "

नाईलाज होऊन त्यांनी मिलरला तेथेच सोडून आपला मार्ग आक्रमिला. दूर जात हळूहळू ते त्या जंगलात अदृश्य झाले आणि अभावितपणे मिलरला रडू कोसळले. वेदनांनी त्याचे शरीर ठणकत होते. वेदना सहन करताना त्याचे शरीर आणि चेहरा वेडावाकडा होत होता. त्यातच त्याला सारखी रक्ती आव होऊ लागली. यातून आपण काही वाचत नाही, याची त्याला खात्री पटली.

मिलरला फार वाईट वाटले. आतापर्यंत दैवाने त्याला कशी झकास साथ दिली होती. विनाशिकेवरचे बहुतेक सारेजण मृत्यू पावले तेव्हा मिलर बचावला होता अचानक त्याच्या हाती एक जीवनाची फळी लागली होती. त्या फळीचा आधार घेतलेल्या भाग्यवानांपैकी दोघे मृत्यू पावले, आणि सुरक्षितपणे बेटावर पोचल्यावर आता मृत्यू त्याला डिवचत होता, भेडसावत होता. विनाशिका बुडाली तेव्हा जर तो वेडावाकडा घुसळला गेला नसता तर आपल्या सहकाऱ्यांबरोबर एव्हाना सुटकेच्या मार्गाला लागता, त्याऐवजी त्या भयाण, जीवघेण्या जंगलात निःशक्त अवस्थेत एकाकी पडून राहणे त्याच्या नशिबी आले होते.

काही वेळानंतर मिलरच्या डोळ्यांपुढे पुन्हा पुन्हा अंधारी येऊ लागली. त्याला घाम फुटला. जीभ शिशासारखी जड झाली. भलभलते भास त्याला होऊ लागले. आणखी थोड्या वेळाने त्याची शुद्ध हरपली. बेशुद्धीपूर्वी अखेरचा विचार त्याच्या मनात आला तो त्याच्या मृत्यूचा.

पण दैवाची लीला अतर्क्य असते, हेच खरे. सुटकेची निश्चित आशा धरून निघालेले मॅचिन्स्की आणि त्यांचे दोस्त यांचा मुळी पुढे पत्ताच लागला नाही. आणि मृत्यू अटळ आहे, अशी समजूत करून घेतलेल्या मिलरला अखेर मृत्युनेच अभयपत्र दिले.

चार–पाच दिवस वेदनांनी ठणकणारे आपले शरीर दोन पायांनी कसेबसे ढकलीत मिलर दिवसरात्र भ्रमिष्टासारखा भटकत होता. त्याच्या पोटात अन्नाचा कण वा पाण्याचा थेंब ठरत नव्हता. अखेर हळूहळू नारळाचे पाणी त्याच्या पोटात ठरू लागले. त्या दिवसापासून त्याच्या शरीरात कणाकणाने शक्ती पुन्हा येऊ लागली आणि १७ जुलै रोजी, म्हणजे त्याच्या विनाशिकेवर टॉर्पेडोचा मारा झाल्यापासून अकरा दिवसांनी, मिलर सुटकेचा विचार पुन्हा करू लागला.

## भीतिदायक वातावरण

त्या संध्याकाळी मिलरने वाळूतच आपल्या तराफ्याचा आराखडा काढला. त्यात एका कामचलाऊ सुकाणूचीही योजना त्याने केली होती. दुसऱ्या दिवशी, झाडा-झुडपांतून काहीवाही शोधत हिंडत असता एके ठिकाणी त्याला जपानी नौदल सैनिक वापरीत तसे कांवळे मिळाले. अनेक जागी ते फाटले होते, पण तरीही त्याचे चाल-चलाऊ शीड करता येणार होते. शिवाय, तराफा बांधताना छत्रीसारखा त्याचा

उपयोग होणार होता तो वेगळाच.

कांबळे मिळाल्यामुळे मिलरचा उत्साह बराच वाढला. गवताचे शीड करायला त्याच्यासारख्या अनभिज्ञ माणसाला कमीत कमी एक आठवडाभर तरी लागला असता. आणि मुक्काम लांबत जाणे धोक्याचे होते. पण त्या कांबळ्यातूनच इतर प्रश्न निर्माण झाले. ज्या अर्थी जपानी कांबळे सापडले त्या अर्थी ते वापरणारे जपानी सैनिक जवळपास असण्याचा संभव दृष्टिआड करता येत नव्हता. आतापर्यंत मात्र जपान्यांच्या अस्तित्वाची पुसटदेखील खूण मिलरला दिसली नव्हती. खरे तर सर्वत्र इतकी शांतता नांदत होती की, त्यामुळे मिलर थोडा निष्काळजी झाला होता. आता ते कांबळे मिळाल्यानंतर, जंगलात तो जपून पाऊल टाकू लागला. न जाणो, या क्षणीदेखील, झाडीचा आडोसा घेऊन जपानी सैनिक त्याला न्याहाळीत असतील; त्याच्या हालचालींनी स्वतःची करमणूक करून घेत असतील. वातावरण उगाचच भीतिदायक झाले होते.

इतक्यात मिलरच्या नाकाला कसलीतरी दुर्गंधी जाणवली. सावधपणे त्याने त्या दुर्गंधीच्या कारणाचा शोध चालवला, आणि जवळच त्याला ते कारण सापडले; एका झाडोऱ्यात एक जपानी सैनिक मरून पडलेला होता. त्याचा मृत देह कुजायला सुरुवात झाली होती. त्याच्या शरीरावर माऱ्याच्या कोणत्याच खुणा दिसत नव्हत्या. आणि भयानक दुर्गंधीमुळे मिलरने त्याची फारशी चिकित्साही केली नाही. कारण, त्याला तराफा बनवण्याच्या कामाला तातडीने लागायचे होते. परंतु त्या मृत सैनिकाचे कपडे, त्याचे बूट, शिधासामग्री, काही हातबॉम्ब यांचा मिलरला केवढा तरी उपयोग होणार होता. मात्र दुर्दैवाने त्या सैनिकाजवळ आणखी कसलेही शस्त्र नव्हते. मिलरने या वस्तू ताब्यात घेऊन प्रेत एका गर्द झाडीत टाकले आणि तो आपल्या जागेकडे परतला.

सकाळ मोठी शुभलक्षणी ठरली होती. त्या जपान्याचे कपडे थोडे घट्ट होत होते. पण पाठीवर आणि काखेमध्ये थोडे फाडल्यानंतर ते वापरता येऊ लागले. बुटांच्या टोकांना मिलरने भोके पाडली आणि आपल्या जादा लांब बोटांना वाव करून दिला. डब्यातील मासळीवर आणि भातावर त्याने ताव मारला. तीन दिवस पुरतील इतके खाण्याचे पदार्थ त्याला मिळाले होते. म्हणून आपली सर्व शक्ती एकवटून तो तराफा बनवण्याच्या कामाला लागला.

तराफ्याकडे येण्याच्या घाईमध्ये मिलरचे त्या जपान्याचे प्रेत पुरून टाकण्याकडे दुर्लक्ष झाले होते. त्याने ते तसेच झाडीत टाकून दिले होते. त्यामुळे त्या प्रेताला सुटलेली दुर्गंधी वाढतच गेली. त्या दुर्गंधीनेच एका जपानी सैनिकाला त्या प्रेताकडे खेचून आणले. तो जपानी सैनिक या आपल्या गहाळ झालेल्या सहकाऱ्याच्याच शोधात होता.

तो ऑगस्टचा महिना होता. झाडीत लपून बसलेल्या मिलरला किनाऱ्यावरून

येणारी पाच जपानी सैनिकांची तुकडी दृष्टीला पडली. आपल्या मृत दोस्ताचे वस्त्रहरण करणाऱ्या अपराध्याचा शोध चालवला होता त्यांनी. हातबॉम्ब मुठीत घट्ट पकडून मिलर त्यांची हालचाल न्याहाळीत होता. एमेककांमध्ये अंतर ठेवून शोध घेणारी ही तुकडी नवशिक्यांची नव्हती. त्यांना नामोहरम करणे हे मोठे कौशल्याचे काम होते. जवळ असलेल्या तीनही हातबाँब्सचा उपयोग करावा लागणार होता कदाचित. आता ते मिलरच्या अगदी जवळ येऊन ठेपले होते. त्या जपानी सैनिकाचे प्रेत आपण पुरले नाही, म्हणून मिलरने स्वतःला शेलक्या शिव्यांची लाखोली वाहिली.

## यशस्वी मोहिम

मिलरने पुन्हा एकदा हातबॉम्बकडे पाहिले. नेम चुकला तर काय होईल, यांचा स्फोट नीट होईल की नाही, असे अनेक प्रश्न त्याच्या मनात तरळून गेले. हातबॉम्ब फेकण्याचे धडे मिलरने गिरवले होते. पण त्याला कितीतरी दिवस झाले होते. हां ते फूटबॉल असते तर गोष्ट वेगळी होती. अलाबामाच्या या माजी फूटबॉलपटूला त्यांच्या बाबतीत अधिक आत्मविश्वास वाटला असता.

मिलरच्या मनात असे काही विचार येतात इतक्यात त्या तुकडीचा प्रमुख त्याच्यापासून काही फुटांवरच येऊन उभा राहिला. मिलर भानावर आला. त्या पाचांचा काटा काढण्याची योजना निश्चित करू लागला.

हा तुकडीचा प्रमुख एखाद्या कसरतपटूसारखा पिळदार दिसत होता. त्याच्या हातात पिस्तुल होते आणि कमरेला एक भक्कम तलवार लटकावलेली होती. त्याचा हुद्दा सार्जंटचा असावा. त्याच्या मागून त्याचे तितकेच धाडसी दिसणारे चार सहकारी परास्परांमध्ये थोडे अंतर ठेवून येत होते. त्यांपैकी एकाच्या हातात एक मशिनगन होती. मिलरला हवीशी वाटली ती ही वस्तू.

मिलरने त्या सगळ्यांना आपल्या पुढून जाऊ दिले, तेव्हा त्यांच्यामध्ये आणि मिलरमध्ये अवघ्या तीन फुटांचे अंतर होते. त्यांच्या नकळत पाठीमागून हल्ला चढवण्याचे मिलरने ठरवले होते. ती पाचांची तुकडी सावधपणे जंगल चाचपीत पुढे निघाली. आता शेवटचा सैनिक मिलरपासून पंधरावीस फुटांवरच होता, मिलर उभा राहिला. पहिल्या हातम्बाँबवरची पिन् त्याने हलकेच काढली. सराव करताना, मोजताना तसे आकडे मोजले आणि काही गणित करून हातबॉम्ब फेकला. त्याच्या पाठोपाठ उरलेले दोन्ही हातबॉम्ब त्याने योजून फेकले, प्रचंड स्फोट झाले आणि ते पाचही सैनिक मरून पडल्याचे दृश्य मिलरला पाहायला मिळाले. मिलरची फेक अचूक होती. त्याच्या अंदाजाप्रमाणे मशिनगन चांगल्या धड अवस्थेत त्याच्या हाती लागली.

आवाजाने भिऊन कितीतरी गल् पक्षी मोठ्याने चीत्कार करीत अस्मानात उडाले. मिलरने त्या पाच जणांची विल्हेवाट लावायला सुरुवात केली. प्रथमतः त्याने

त्यांच्यापाशी असलेल्या सर्व उपयुक्त वस्तू काढून घेतल्या. मग तो मुक्कामावर परतला.

या यशस्वी मोहिमेमुळे मिलरमध्ये उत्साह संचारला. आता तो चांगला शस्त्र-सज्ज होता. भरपूर खाण्याचे पदार्थ त्याच्याजवळ जमा झाले होते. आता अरुंदेल बेट तातडीने सोडण्याची आवश्यकता उरली नव्हती. सर्व गोष्टींची अनुकूलता होईपर्यंत वाट बघायला हरकत नव्हती. त्यामुळे मिलरचे तराफ्याचे काम मागे पडले आणि बेटावरील परिसराचे बारकाईने निरीक्षण करण्यात तो अधिकाधिक वेळ घालवू लागला.

## जपान्यांची झोप उडाली

असे दोन आठवडे गेले. या दोन आठवड्यांत जपानी तुकडीच्या व्यवस्थेची आणि हालचालींची बरीच माहिती मिलरने गोळा केली होती. त्यानुसार प्रचंड साम-र्थ्याच्या या तुकडीविरुद्ध एकाकी संग्राम करण्याची साहसी योजना त्याने आखली होती. संरक्षण व्यवस्था जेथे तुटपुंजी असेल तेथे पहिली चढाई करण्याचे मिलरने ठरवले. बेटावरील वाहातूकव्यवस्था अगदीच जुजबी होती. वाहतूक करणाऱ्या मोटारींना पुरेसे संरक्षण दिले जात नव्हते. तसे देण्याची गरजच मुळी जपान्यांना कधी भासली नव्हती. बंदरापासून खूप दूर आतील भागी असलेल्या मध्यवर्ती तळावर दर आठवड्याला साधनसामग्री नेणाऱ्या चार मालवाहू मोटारींच्या काफि-ल्यावर हल्ला चढवायचा धाडसी निर्णय मिलरने घेतला.

या मोटारींचा मार्ग दऱ्याडोंगरांतून जात होता. त्यातील एक अत्यंत विकट होता. हा चढ चढताना गाड्यांना वेग अगदी मंद करावा लागे. या चढाच्या मध्यभागी असलेल्या वाकणावर मिलर लपून बसला. पहिला ट्रक मिलरने तसाच जाऊ दिला. तो हळूहळू टेकडीच्या मध्याशी पोहोचत होता. त्यामागून येणारे दोन ट्रक मिलरला समोर दिसत होते. आणि चौथा ट्रक धीमेपणे त्यांना गाठण्याचा प्रयत्न करत होता. मिलरने हातबॉम्ब सरसावले आणि नेम धरून एक हातबॉम्ब शेवटच्या ट्रकवर भिरकावला. तितक्याच त्वरेने त्याने पहिल्या ट्रकवर लागोपाठ दोन हातबॉम्ब फेकले. पहिल्या ट्रकचा ड्रायव्हर तत्काळ गतप्राण झाला आणि तो ट्रक वेगाने उतारावरून घसरू लागला. आग आणि धुराचे लोट त्यातून उसळत होते. त्याने दुसऱ्या ट्रकला जोराची धडक दिली, तोपर्यंत मिलरने दुसऱ्या व तिसऱ्या ट्रकवर हातबॉम्ब फेकून मशिनगन सरसावली होती. ट्रकमधून होरपळून बाहेर पडणाऱ्या जपानी सैनिकांना मिलरच्या या मशिनगनमाऱ्याला बळी पडावे लागले. सारे शांत झाले तशी मिलरने थोडी साधनसामग्री गोळा केली आणि एखाद्या रानटी श्वापदासारखा तो जंगलात अदृश्य झाला.

आता अरुंदेल बेटावर केवळ जपान्यांचा तळ नव्हता, तर एक अमेरिकन सैनिक त्या बेटाचा ताबा घेण्यासाठी त्यांच्याशी मुकाबला करण्याच्या ईर्ष्येने पेटला होता.

लौकरच मिलरने जपान्यांची झोप उडवली.

## वृकमानवाच्या कथेचा जन्म

वेळ रात्रीची होती. अरुंदेल बेटावरील जपानी तळाचा प्रमुख अधिकारी मेजर केनजी कुनिटसुगू भोवतालचा घनदाट अंधार एकटक निरखीत होता. त्याचे मन शांत नव्हते. कसली तरी हुरहूर त्याला लागून राहिली होती. तीन आठवड्यांपूर्वी, त्याने पाठवलेले एक–टेहळणी पथक कुणातरी अज्ञात मारेकऱ्याने गारद केले होते. त्या एक वा अनेक मारेकऱ्यांचा मागमूस अजून लागत नव्हता. अमेरिकन सैन्याची एखादी तुकडी अरुंदेल बेटावर उतरल्याची वार्तावातमी नव्हती. त्यामुळे हे अमेरिकेच्या निवडक आक्रमक तुकडीचे काम आहे, असे मानता येत नव्हते. वरे, बेटावर गनिमी टोळयांचाही कधी उपद्रव झाला नव्हता. आणि सैनिकांमध्ये तर कसल्या भलभलत्या वावड्या उठत होत्या. त्या जर खऱ्या मानल्या तर आज रात्रीदेखील काहीतरी भयंकर प्रकार घडेल अशी अपेक्षा करता येण्यासारखी होती. रात्र अमावास्येची होती अशा रात्री भक्ष्य शोधणे वृकमानवाला कितीतरी सोपे जाणार होते.

एकच आठवड्यापूर्वी चार ट्रक्सना वाटेत अडवून कोणीतरी त्यांचा नायनाट केला होता. त्यात नऊ सैनिक मृत्युमुखी पडले होते आणि बारा जणांना जबर जखमा झाल्या होत्या, फक्त एक ड्रायव्हर त्यातून सुरक्षित सुटला होता. तो तळावर परतला तेव्हा भीतीने त्याची बोबडीच वळली होती. झालेला हल्ला हे कसल्यातरी अमानुष शक्तीचेच काम आहे; असे तो शपथपूर्वक पुनः पुन्हा सांगत होता. त्याच्या म्हणण्याप्रमाणे, एखाद्या प्रचंड लांडग्यासारख्या दिसणाऱ्या, हातात जपानी मशिनगन घेऊन ती हवी तशी चालवणाऱ्या, कोठल्यातरी भयंकर प्राण्याचे हे कृत्य होते.

त्याची भाकडकथा ऐकून मेजरला हसू फुटले होते. त्याने ताबडतोब त्या ड्रायव्हरची इस्पितळात रवानगी केली होती. पण त्यानंतरच्या पाच दिवसांत त्याच्या तुकडीतील तेरा जणांना गूढ अवस्थेत मृत्यू आला होता. काही जणांचे गळे दाबले गेले होते. काही जणांच्या मानेवरून सुरी फिरली होती. काहींच्या मस्तकात मागून गोळी घुसली होती. त्याशिवाय सहा ट्रक्सना आगी लागून ते निकामी झाले होते आणि प्रत्येक वेळी वाचणारी माणसे, वृकमानवाच्या स्वरूपात असलेल्या अमानुष शक्तीचेच हे काम आहे अशी एकच कथा एक वाक्यतेने सांगत होती.

आता तर तळावर कोणतीही गैर गोष्ट घडली की त्याचा संबंध त्या वृकमानवाशी जोडला जात होता, पत्रे उशिरा आली, स्वयंपाक बिघडला, एखाद्या गटाला अत्यंत कष्टाची कामगिरी करण्याचा हुकूम मिळाला, टेलिफोनच्या तारा तुटल्या, तारायंत्रात काही बिघाड झाला तर प्रत्येक वेळी, हे त्या वृकमानवाचे कृत्य असणार अशी सर्वांची ठाम खात्री होत असे.

वास्तविक कुनिटसुगूने वृकमानवाबद्दल चकार शब्द काढायला हुकमाने मनाई केली होती. पण प्रत्यक्ष अनुभव घेतलेले सैनिक गप्प थोडेच बसताहेत ! वृकमानवाबद्दलच्या कथा छावणीभर बोलल्या ऐकल्या जात होत्या. कोणी त्यात स्वत:चीही भर बेमालूमपणे घालत होते. परिणामत: मेजर कुनिटसुगूच्या मनावरदेखील नकळत वृकमानवाचा पगडा बसत चालला होता.

एकूण जपान्यांना कृतान्त काळासारख्या भासणाऱ्या अमेरिकन जनरल मॅकॉर्थरपेक्षाही हा वृकमानव भयंकर होता. आता तर आपल्याबरोबर वृकमानवांची टोळीच्या टोळी आणून तो जपान्यांविरुद्ध उभा ठाकला आहे, अशी वदंता पसरत चालली होती. एकाच वेळी अनेक स्थळी त्याचे अस्तित्व जाणवत होते. अशा या वृकमानवाचा लौकरच बंदोबस्त झाला नाही तर आपली धडगत नाही हे कुनिटसुगूला कळून चुकले होते ... मात्र त्या रात्रीचा वृकमानवाचा बेत कुनिटसुगूला कळला असता तर त्याने सुटकेचा नि:श्वास सोडला असता. कारण, वृकमानव त्या रात्री अरुंदेल बेट सोडायची तयारी करत होता.

## वाळूवर संदेश लिहिला

खरे सांगायचे तर त्या सगळ्या भयकारी वातावरणात एखाद्या पूर्ण सावध माणसानेदेखील मिलरला अमानुष मानण्याची चूक केली असती. मिलरचे वाढलेले केस खांद्यापर्यंत लोंबत असत, त्याच्या बुभुक्षित चेहऱ्यावर तांबूस रंगाची दाढी माजली होती. त्याचे चाळीस पौंड वजन कमी झाले होते. त्यामुळे हाडे वर येऊन तो भयानक दिसत होता. अर्धनग्नावस्थेत फिरणाऱ्या मिलरला पाहून झाडाझुडपांतून भक्ष्य शोधीत हिंडणाऱ्या भुकेल्या लांडग्याचा आभास होणे अत्यंत स्वाभाविक होते.

परंतु मिलरची त्याला स्वत:ला अज्ञात असलेली, ही भूमिका आता संपणार होती. गेले काही दिवस अमेरिकन नाविक दलाचे एक विमान अगदी खालून उडत त्या भागाचे बारकाईने निरीक्षण करीत असलेले मिलरने पाहिले होते. मिलरजवळ एका जपानी सैनिकाचे घड्याळ होतेच. त्याच्यावरून या विमानाच्या वेळा त्याला निश्चित करता आल्या. आणि एक दिवशी ते विमान येण्याच्या आधी थोडा वेळ मिलरने ' अमेरिकन सैनिकाला मदत करा ' असा संदेश नितळ वाळूवरती लिहून ठेवला होता. विमान आल्यावर मिलर धावत किनाऱ्यावर गेला. लक्ष वेधून घेण्यासाठी त्याने पुन्हा पुन्हा हात हालवला; इतकेच नव्हे तर एका जपानी सैनिकाकडून मिळवलेले, रंगीत धूर ओकून लक्ष वेधण्याच्या कामी उपयोगी पडणारे पिस्तुलही त्याने झाडले. (सुदैवाने ही रंगीत निशाणी जपान्यांच्या नजरेस आली नव्हती.) दुसऱ्या दिवशी संध्याकाळी विमानाने मिलरला जबाब दिला : पुढील दिवशी पहाटे तीन वाजता त्याच जागी येऊन विमान मिलरला उचलणार होते.

तीन वाजायला थोडासाच वेळ होता, मिलरने आपला गुहेतील मुक्काम उठवला.

किनाऱ्याकडे निघण्यापूर्वी त्याने त्या त्रेचाळीस दिवसांच्या निवासस्थानावर अखेरचा दृष्टिक्षेप टाकला. खरोखरच ती एखाद्या वन्य श्वापदाची गुहा दिसत होती. फक्त आजूबाजूला सावजांची हाडे पडलेली नव्हती इतकेच काय ते. त्याऐवजी जपानी बीअरच्या बाटल्या इतस्तत: विखुरल्या होत्या. खाण्याचे डबे, कपडे, दारूगोळा आणि इतर वस्तू एका बाजूला कशातरी रचून ठेवल्या होत्या. गुहेच्या बाहेर मिलरचा अर्धवट तयार झालेला तराफा तसाच पडून होता. डोलकाठीला लावलेले त्या जुन्या कांबळ्याचे शीड तसेच होते. एका लाकडी खोक्यावर जपानी राष्ट्रध्वज एखाद्या टेबलावरील आच्छादनासारखा घातलेला होता. त्यावर मिलरच्या शेवटच्या जेवणाच्या खुणा स्पष्ट दिसत होत्या, आणि एका उलटचा केलेल्या खोक्याच्या खाली रेडिओचे काही भाग मिलरने जमवलेले होते. त्या भयाण एकांतात या त्याच्या छंदाने त्याला केवढा तरी विरंगुळा लाभला होता.

मिलरने मशिनगन उचलली. खंजीर कमरेला लटकावला हातबॉम्बची एक पिशवी खांद्यावर टाकली आणि तो किनाऱ्याकडे निघाला.

आता तीन वाजायला फारच थोडा अवकाश होता. दुरून येणाऱ्या विमानाचा अस्पष्ट आवाज कानांवर येऊ लागला होता. सुटकेच्या विचाराने मिलरच्या अंगात उत्साहाचे वारे संचारले होते. उडचा मारीतच तो जंगल तुडवत होता. आता एक लहानसा झाडोऱ्याचा पट्टा ओलांडला म्हणजे किनाराच. लाटांचा मर्मरध्वनीदेखील मिलरला ऐकू येत होता. काही पावलांचेच अंतर बाकी होते.

आणि अचानक मिलर भीतीने गोठूनच गेला. नित्यपरिचित झुडुपांमध्ये कसली तरी हालचाल त्याला दिसली होती. चमत्कारिक दिसणाऱ्या सावल्या गूढपणे हालत होत्या. इतके दिवस ज्या जंगलाने स्नेह दाखवला ते अचानक परके वाटू लागले. मिलर हळूच जमिनीवर बसला आणि नंतर पालथा झाला. त्याला वाटले आपण जपान्यांच्या सापळ्यात अचूक अडकलो आहोत. मोठ्या सावधपणे त्याने हातबॉम्बला हात घातला, पण पुन्हा त्याने विचार बदलला. जपानी सैनिक विखुरलेले असतील तर स्फोटामुळे उगाचच आपला नेमका ठिकाणा त्यांना कळेल; त्यापेक्षा अंधाराचा फायदा घेऊन त्यांना गुंगारा देऊन निसटून जाणे अधिक शहाणपणाचे होते. मिलर हळूहळू पुढे सरकला. खंजीराची थंडगार मूठ त्याने हातात घट्ट पकडली होती. अचानक वाऱ्याचा झोत आला आणि मिलरच्या शरिरातून भीतीची एक लहर थरकत गेली. त्याने खंजीर सरसावला. आत्ता शेवटच्या क्षणी होणारा घात आधीच का झाला नाही असा एक स्वयंशापी विचार मिलरच्या मनात चमकून गेला.

क्षणभर त्याने समोरच्या झुडपावर खिळलेली आपली नजर वळवून घड्याळाकडे पाहिले, दोन वाजून सत्तावन्न मिनिटे झाली होती. अजून तीन मिनिटांचा अवधी होता. विमानाचा आवाज आता व्यवस्थित ऐकू येत होता. मिलर पुढे सरसावला.

आपणच आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे, असे मिलरला वाटले. नाहीतर रंगीत धुराची निशाणी फेकण्याचा आततायीपणा एखाद्याने कसा केला असता ? जपान्यांची कदाचित अनेक दिवस आपल्यावर पाळत असण्याची शक्यता होती; आपण मात्र या शक्यतेकडे साफ दुर्लक्ष केले होते; आणि आता सुटका उंबरठ्याशी आली असताना जपान्यांनी टाकलेल्या धूर्त जाळ्यात आपण नेमके अडकले आहो; असे मिलरला वाटले. काहीतरी निर्णय घेणे त्याला भागच होते. एक तर सर्व धोका पत्करून किनाऱ्याकडे जायचे किंवा सपशेल शरणागती पत्करायची. पुन्हा मुक्कामावर परतणे वेडेपणाचे होते. जपान्यांनी ती जागा ताब्यात घेतली असण्याची बरीच शक्यता होती.

पुन्हा एकदा झुडपातील सावल्या हलल्या. त्या वाऱ्यामुळे हलल्या नाहीत हेही मिलरने पाहिले. किनाऱ्यावर विमान उतरले होते. त्याच्या विसावणाऱ्या इंजिनाचा आवाज येत होता. विमान फार काळ थांबणे शक्य नव्हते. अचानक खसखसाट होऊन कोणीतरी मिलरच्या रोखाने झेपावले. खंजीर परजीत मिलरनेही पुढे उडी मारली, आणि खंजिराचा वार केला ! रानडुकरासारखा एक प्राणी त्या जखमेने विव्हळ होऊन घाबरून पळत सुटला. एकूण जपानी सैनिक समजून या रानडुकरालाच घाबरला होता तर मिलर. त्याच्या छातीवरील अवजड ओझे उचलले गेले. साऱ्या दिशा भरून टाकणारे विजयी हास्य करण्याचा झालेला मोह मिलरने प्रयत्नपूर्वक आवरला. स्वसंरक्षणासाठी अत्यंत क्रूर आणि बेदरकार बनलेल्या मिलरच्या नेत्रांत अश्रू उभे राहिले. तो पुढे धावला. चंद्रप्रकाशाने किनारा उजळला होता, आणि एक विमान त्याची प्रतीक्षा करत खरोखरच उभे होते.

## कल्पिताहून सुरस आणि चमत्कारिक

मिलरने मागील जंगलाकडे अखेरचा एक शोधक दृष्टिक्षेप टाकला आणि तो विमानाच्या दिशेने झेपावला. विमानात अर्थातच त्याचे हार्दिक स्वागत झाले.

" एकूण तूच तो अरुंदेल बेटावरचा वृकमानव नाही का ?" एक जण हसत हसत म्हणाला, " आणि तुझा अवतार पाहता आपणसुद्धा त्यावर सहज विश्वास ठेवला असता असं वाटतं. "

मिलर गोंधळला. म्हणाला, " वृकमानव ? हा काय प्रकार आहे ? कोणाबद्दल बोलताहा तुम्ही ?"

" म्हणजे तू अरुंदेल बेटावर केवढा हलकल्लोळ माजवला होतास याची कल्पनाच दिसत नाही तुला म्हणायची. आम्ही जपान्यांचे काही संदेश मध्येच उचलले, त्या प्रत्येक संदेशात अरुंदेल बेटावर जपान्यांच्या विरुद्ध उठलेल्या एका वृकमानवाबद्दल तक्रार होती. धास्ती व्यक्त केली होती, आणि जपान्यांच्याविरुद्ध अरुंदेल बेटावर लढा तूच दिला असणार म्हणजे तूच तो वृकमानव आहेस, असं म्हटलं पाहिजे. "

मिलरने मान हलवली. तो चिडून म्हणाला, " आहेस नाही. होतो ! जरा भूतकाळ वापरायची सवय करा आता. "

" आहेस किंवा होतास. पण तू असेपर्यंत त्या जपान्यांना काही सुखाची झोप लागली नाही हे मात्र निश्चित. "

नुमिया यथील इस्पितळात विश्रांती घेत असता मिलरची ही चित्तथरारक कथा सर्वत्र पसरली होती. मिलरकडून वरिष्ठ अमेरिकन सेनाधिकाऱ्यांना बहुमोल माहिती मिळाली होती. आपल्या दीर्घकालीन अवलोकनामुळे जपान्यांनी व्यापलेल्या त्या बेटांवरील त्यांची विशेष संरक्षित ठिकाणे, अन्नधान्याचे साठे, दारूगोळयाचे कोठार, अरुंदेल आणि न्यू जॉर्जिया बेटांमधील जपानी नौदलाच्या हालचाली, पाणीपुरवठयाची व्यवस्था, मोहिमेच्या दृष्टीने उपयोगी अशा किनारपट्टीवरील जागा, या साऱ्यांची अतिशय नेमकी माहिती मिलरने दिली.

मिलरची ही कल्पिताहून सुरस आणि चत्मकारिक सत्यकथा ऐकण्यासाठी कितीतरी जण उत्सुकतेने त्याला भेटायला यायचे. दर्यासारंग हाल्सेदेखील भेटून गेले त्याला त्यांनी मिलरच्या विलक्षण शौर्यकृत्याबद्दल त्याची ' नेव्हल क्रॉस ' या सन्मानपदकासाठी खास शिफारस केली. O

---

## ☐ अन्न-समस्येचे उत्तर : विज्ञान

भारत-भेटीला आलेल्या काही रशियन शास्त्रज्ञांनी असा विश्वास प्रकट केला आहे की, आपल्या पृथ्वीवर सगळया मानव-जातीला पुरेल एवढे अन्न आहे. मोठा दुष्काळ पडल्यास सबंध मानव-जातीचे जीवित धोक्यात येईल, हे काही अमेरिकन शास्त्रज्ञांचे मत निराशावादी आहे. विज्ञानामुळे मानवी जीवन वाढविण्याचे कितीतरी मार्ग मोकळे झाले आहेत, हे निराशावादी शास्त्रज्ञांच्या लक्षात येत नाही. शेतकी-शास्त्रज्ञ इराक्ली सिन्सागिन यांच्या मते जगांतल्या एकूण भूमीपैकी फक्त ११ टक्के जमिनीवर शेती ोत आहे. या शतकाच्या अखेरीपर्यंत याच्या दुप्पट जमिनीवर शेती करता येईल. आणखी एका शास्त्रज्ञाच्या मते ' समुद्रात शेती ' केल्यास-म्हणजे मच्छीमारीने-जगातील अन्नोत्पदनातखूप मोठी भर पडू शकेल. सध्या मानवाला सबंध जगात एकूण मिळणाऱ्या सेंद्रिय पदार्थांपैकी अर्धा भाग म्हणजे तीन हजार कोटी टन समुद्रातून व महासागरांतून मिळतात. येत्या दशकात हे प्रमाण कित्येक पट वाढण्याची शक्यता आहे. व्हॅलेंटाईन रास्त्यानिकॉव्ह यांच्या मते अप्रगत देशांनी आमूलाग्र भूमि-सुधारणा केली तर त्यांची अन्न-समस्या निच्छितपणे सुटू शकेल. या देशात भासणारी अन्न-धान्याची तीव्र टंचाई मोठया शेतांच्या पद्धतीने दूर होऊ शकेल.

---

# डच चित्रपट सप्ताह

सर्वसाधारणपणे आपल्याकडील चित्रपट-शौकिनांना विदेशी चित्रपट पाहण्याची भूक सामान्यपणे केवळ इंग्रजी चित्रपटांवर भागवावी लागते. या चित्रपटांनाही सेन्सॉरची वेडीवाकडी कात्री लागलेली असतेच. अन्य देशांचे चित्रपट अगदी क्वचित पाहावयास मिळतात.

चित्रपटक्षेत्रामध्ये आघाडीवर असलेल्या अनेक देशांचे चित्रपट प्रयत्नपूर्वक मिळवून ते दाखवण्याचे कार्य 'फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटी' या संस्थेशी संलग्न असलेल्या देशांतील विविध फिल्म सोसायटीज करीत असतात.

पुण्यातील, फिल्म कल्चरल सेंटर, ही अशीच एक संस्था आहे. या संस्थेने गेल्या आठवड्यात आपल्या सभासदांसाठी 'डच चित्रपट सप्ताह' आयोजित केला होता. तीन मोठे व तीन लहान असे सहा चित्रपट या सप्ताहात दाखवण्यात आले.

डच भाषेत तयार झालेल्या चित्रपटांचा प्रेक्षकवर्ग मर्यादित असल्याने संख्यात्मक दृष्टीने या भाषेतील चित्रपटांची निर्मिती बेताचीच असते. तयार होणाऱ्या चित्रपटांतही लघुपटांना प्राधान्य असते. आणि कलात्मक मूल्यमापनाची कसोटी लावली असताही कथा–चित्रांपेक्षा लघुपट अधिक सरस ठरतात. याचा प्रत्यय या सप्ताहात पाहिलेल्या डच चित्रपटांच्या बाबतींतही आला.

सप्ताहामध्ये 'आ–तमारा,' 'फॅकेड' व 'द फ्लॉवर्स' हे तीन लघुपट दाखवण्यात आले. तांत्रिक दृष्ट्या–विशेषत: कॅमेरा वर्क व संगीत यांचे बाबतीत सर्वच चित्रपटांचा दर्जा उत्कृष्ट होता. लघुपटांपैकी फ्लॉवर्स व फॅकेड यांचा प्रयोगक्षम निर्मिती



। जोसेफ गिल्टी । चित्रपट–पॅरोनोइआ ।

(Experimental Production) म्हणून उल्लेख करावा लागेल. 'फ्लॉवर्स' हे कार्टून चित्र खरे, परंतु छायाचित्रणातील विशिष्ट कौशल्याचा वापर मोठ्या खुबीने केलेला आढळला. "कॉम्पोझिशन लाईन शेप व फॉर्म" यांच्यावर लक्ष केंद्रित केल्याचे जाणवत होते. फुलवेड्या छोट्या माणसाची फुलांसाठी प्रत्येक वेळी नव्याने नकळत चालणारी धडपड पाहताना मोठी गम्मत वाटत होती.

यौवन आणि स्वातंत्र्य यांचा अन्योन्यसंबंध एका छोट्या प्रसंगातून दाखवण्याचा प्रयत्न 'आ-तमारा' या लघुपटात करण्यात आला आहे. ॲमस्टरडॅममध्ये प्रवाशांना प्रेक्षणीय स्थळे दाखवणाऱ्या एका बोटीवर मार्गदर्शिकेचे काम करणाऱ्या एका तरुण शालेय विद्यार्थिनीच्या मानसिक आंदोलनाची नोंद या लघुपटात घेण्यात आली आहे. तिच्या प्रियकर मित्राला तिचा हा व्यवसाय आवडत नाही. या मर्यादा अखेरीस ती मानत नाही व पुन्हा आपल्या पूर्व–व्यवसायाकडे वळते. धाडस करून ती व तिचे मित्र एक बोट पळवतात. तथापि योग्य वेळी ही गोष्ट पोलिसांच्या लक्षात आल्याने ते या मंडळींचा बंदोबस्त करतात. छोटा असूनही चित्रपट कमालीचा सजीव असल्याने परिणामकारक वाटतो. फॅकेड हा लघुपटही वेगळ्या पद्धतीचा आहे. हेगचे १९ व्या शतकातील वैभव दाखवत असतानाच कृत्रिम वातावरणात वावरणाऱ्या 'लोनी' या महिलेचा होणारा मानसिक कोंडमारा मोठ्या मार्मिकपणे दाखवला आहे.

दाखवण्यात आलेल्या तीन कथा-चित्रांपैकी 'पॅरानोइआ' वेगळे व मनो-

विश्लेषणात्मक वाटले. हरमन्स नावाच्या डच लेखकाने लिहिलेल्या कादंबरीवर हा चित्रपट आधारलेला आहे. उत्कृष्ट व परिणामकारक छायाचित्रण व प्रमुख व्यक्तिरेखांच्या मानसिक अवस्थांची कौशल्यपूर्ण उकल ही दोन ठळक वैशिष्टये. क्लिव्हर हा एकलकोंडा माणूस युद्धोत्तर कालामध्ये काही विकृती निर्माण झाल्याने स्वतःला नाझी सैनिक समजत असतो. आपल्यामागे पोलिसांचा ससेमिरा असून आपण केव्हाही पकडले जाऊ, अशी भीती त्याला वाटत असते. ॲना ही त्याची प्रेयसी त्याची विकृती दूर करण्याचा प्रयत्न करीत असते. तथापि क्लिव्हरचा मानसिक ताण वाढत जाऊन शेवटी तो आपल्या घरमालकाचा व ॲनाचा खून करतो आणि स्वतः आत्महत्या करतो.

निकोलाय व्हॅन डर हाइडे या तरुण दिग्दर्शकाने 'मॉर्निंग ऑफ सिक्स वीक्स' हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. डच सिनेमामध्ये नावीन्याचा हव्यास घेऊन काही तरी वेगळे करण्याची धडपड करणारी जी तरुण मंडळी आहेत, त्यांमध्ये हाइडे आघाडीवर आहे. 'मॉर्निंग ऑफ सिक्स वीक्स' हे हाइडे याचे पहिले चित्र. फॅशन मॉडेल म्हणून काम करणारी एक तरुणी व एक रेसिंग मोटार ड्रायव्हर यांची प्रेमकथा चित्रपटात सांगितली आहे. अनेक हेलकावे घेत वाहत जाणारे हे कथानक जिमी (ड्रायव्हर) व ॲनेटी (मॉडेल गर्ल) यांच्या ताटातुटीनंतर संपते. ॲनेटी-नंतर जिमीच्या आयुष्यात आलेली तरुणी ही त्याला शाब्दिक आश्वासने देऊन सोडून जाते.

'डान्स ऑफ हेरॉन' या चित्रपटात पत्नीच्या चारित्र्याबद्दल संशयाने व्यथित झालेल्या पुरुषाची कथा गुंफली आहे. तो आपल्या पत्नीचा अतिशय शांतपणे, विविध प्रकारे छळ करून अभिनव पद्धतीने तिचा सूड घेतो. चित्रीकरण पद्धतीवर युरोपियन पद्धतीचा ठसा उमटल्याचे चित्रपट पाहत असताना जाणवते.

डच चित्रपट पाहिल्यावर नकळत तुलना होते ती आपल्या चित्रपटांशी. जागतिक चित्रपट सृष्टीमध्ये डच चित्रपटांचा दर्जा फारसा वाखाणसारखा नसला तरी आपल्या चित्रपटांच्या तुलनेत हे चित्रपट दोन बाबतींत उजवे वाटतात—कथा विषयातील विविधता आणि कॅमेऱ्याचा बोलका वापर. या बाबतीत या चित्रपटांची सरसपणा नाकारता येणार नाही.

## डच चित्रपटांसंबंधी थोडेसे

डच बोलणारे हॉलंडचे १ कोटी २५ लाख नागरीक आणि फ्लेमिश बोलत असून डच भाषा समजणारे अन्य साठ लाख, एवढाच भाषेमुळे आकर्षित होणारा डच चित्रपटांचा प्रेक्षकवर्ग. स्वाभाविकपणेच व्यावसायिकदृष्टया चित्रनिर्मितीला अनेक मर्यादा पडतात. सर्वसाधारणपणे शंभर लघुपट व तीन ते चार कथाचित्रपट प्रतिवर्षी निर्माण करण्यात येतात. कथा—चित्रपट निर्मितीमध्ये हॉलंडच्या चित्र-

पटांना आंतरराष्ट्रीय क्षेत्रात मानमान्यता मिळाली नसली तरी लघुपटांमध्ये मात्र अनेक आंतरराष्ट्रीय महोत्सवांतून या देशाने यश मिळविले आहे. युद्धपूर्व काळामध्ये असे यश मिळवून देणारा म्हणून जोरीस इव्हान्सचा उल्लेख करावा लागेल. त्याची परंपरा जॉन फ्रेनो याने सांभाळली. ' स्काय ओव्हर हॉलंड ' या त्याच्या लघुपटाला १९६७ साली केन्स येथील महोत्सवामध्ये ग्रँड प्रिक्स पारितोषिक मिळाले.

या क्षेत्रात अभूतपूर्व यश मिळवण्याचा मान मात्र बर्ट हंसट्रा याच्याकडे जातो. मिरर ऑफ हॉलंड ( १९५० ), पँन्टा ऱ्ही (१९५१), फन फेअर (कथा-चित्र १९५८), झू ( १९६२ ), मन डच ( १९६३ ) या त्याच्या चित्रपटांचा विशेष उल्लेख करणे आवश्यक वाटते. एच. व्ही. होर्स्ट या निर्मात्या-दिग्दर्शकानेही कलापूर्ण लघुपट तयार करून आपल्या देशाला अनेक संन्मान मिळवून दिले; तर कथा-चित्रपटांमध्ये ' फोन्स रेडमार्क्स ' याने आपले प्रभुत्व दाखवून दिले.

## सरकारी सहकार्य

आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांतून डच चित्रपटांनी मिळवलेले यश पाहून हॉलंडच्या शासनाने या व्यवसायाला सर्वतोपरी साहाय्य करण्याचा निर्णय घेतला आहे. अनेक निर्मात्यांना प्रत्यक्ष आर्थिक सहकार्य दिले जाते. तांत्रिक बाबींचे शिक्षण देण्यासाठी ' नेदरलँडस फिल्म ॲकॅडमी ' ही संस्था स्थापन करण्यात आली असून अनेक होतकरू तरुण मंडळी या संस्थेतून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा लाभ घेत आहेत. याखेरीज दि. १ जानेवारी १९६९ पासून डच चित्रपटांवरील करमणूक कर पूर्णपणे उठवण्यात येणार आहे. चित्र-निर्मितीस त्याचा लाभ मिळाल्याशिवाय राहणार नाही (आपल्या देशात निर्माते-दिग्दर्शक सातत्याने ओरडत असूनही करमणूक व अन्य करांचे ओझे सतत वाढत आहे ). तंत्रावरील असामान्य प्रभुत्व योजनाबद्ध निर्मिती, विषयातील विविधता, सखोल आणि तर्कशुद्ध हाताळणी यांमुळे डच चित्रपट व्यावसायिकांकडे जागतिक बाजारपेठेत स्वतःचे असे खास स्थान निर्माण केले आहे. आणि जुन्या जाणत्यांचे मार्गदर्शन, तरुणांचा वाढता उत्साह, निर्मिती-साधनांची विपुलता, यांमुळे भावी काळातही या छोट्या देशाकडून मोठ्या कामगिरीची अपेक्षा आहे.

**– शरद गोखले**

# तुमचे भविष्य

# आमचा अंदाज

**मेष :** वारे कसेही वाहो, ग्रहस्थिती अनुकूल–प्रतिकूल असो, सतत प्रयत्नशील राहणे हा तुमचा स्थायीभाव. यामुळेच साडेसातीसारखा खडतर कालही तुम्हांला फारसा बाधू शकत नाही. खडतर कालावर मात करण्याचे सामर्थ्य फक्त तुम्हा मेषराशी व्यक्तींतच पाहावयास मिळते.

हा महिना तुमच्यातील कर्तृत्वशक्तीला आव्हान देणारा आहे. दुसऱ्या पंधरवड्यात माझ्या या म्हणण्याचा आपणांस हातोहात प्रत्यय येईल. आजवरचे सारे परिश्रम फलद्रूप झाल्याचा साक्षात्कार घडेल आणि नोकरीधंद्याचे पाऊल सतत पुढे पुढे पडत असल्याची जाणीव व्हायला लागेल.

दि. ५ ते ८, २० ते २७ या काली अनेक योजना यशस्वी व्हाव्यात.

**वृषभ :** या महिन्यातही तुमच्या प्रगतीचा वेग आणखी वाढेल. पंचमस्थानी घडून येणाऱ्या गुरू-हर्षल युतीपासूनच (दि. ११) आपल्या अंगीकृत कार्याला एकाएकी उत्थान मिळेल. अनपेक्षितपणे बदल घडेल आणि शनी मार्गी झाल्यानंतर (दि. २१) तर तुमच्या साऱ्या व्यथाविवंचना मिटून सर्वत्र प्रसन्न वातावरण दिसू लागेल.

शुक्र हा तुमच्या जीवनाचा सूत्रधार. तो भाग्यात येत असल्यामुळे आपण कला-साहित्याच्या क्षेत्रात जागतिक विक्रम मोडून नवीन उच्चांक निर्माण कराल.

दि. ४ ते ७, १३ ते २०, २६ ते ३१ अपेक्षासाफल्याचा काल.

**मिथुन :** अजून दि. १८ पर्यंत मंगळ अनिष्टच असल्यामुळे तोपर्यंत आपणांस जपूनच पाऊल टाकावे लागेल. विशेषतः, दि. १० चा शनी-मंगळ प्रतियोग अनेक अडचणी, कटकटी निर्माण करणारा जाणवेल.

दि. १८ पासून अनिष्ट काल जवळ जवळ ओसरल्याचा प्रत्यय यायला लागेल.

## श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## डिसेंबर महिन्याचे भविष्य

नोकरीधंद्यांत प्रगतीची लक्षणे दिसायला लागतील. घरचे अनारोग्य, आर्थिक चणचण, नोकरीधंद्यांतील पेचप्रसंग या साऱ्या दिव्यातून आपण बाहेर पडाल. तरी-सुद्धा काही दिवस थोरांचा सल्ला घेऊनच वागावे लागेल.

दि. १ ते ३, १३ ते १९, २५ ते ३१ या काली आपले प्रयत्न वाया जाणार नाहीत.

**कर्क** : आपल्या प्रगतीचा आलेख या महिन्याच्या मध्यापर्यंत सारखा वरवर सरकू लागेल. दि. १८ ला मंगळ चौथा होताच आपल्या प्रगतीला पायबंद बसल्या-सारखी परिस्थिती निर्माण होऊ लागेल.

तरीसुद्धा गुरू पराक्रमात असल्यामुळे हा सारा महिना आपणांस अपेक्षासाफ-ल्याचा ठरावा. एकाएकी दूरचा प्रवास, नोकरीधंद्याच्या स्वरूपात पालट इ. गोष्टी या महिन्यात विशेष प्रकर्षाने अनुभवाव्या लागतील.

दि. २१ ला शनी मार्गी झाल्यानंतर नवी क्षितिजे दृष्टीपुढे दिसू लागतील.

दि. २ ते ५, १६ ते २१, २५ ते ३० अपेक्षेबाहेर यश पदरी पडावे.

**सिंह** : सिंहराशी व्यक्तींच्या बाबतींत दोन घटना विशेष महत्त्वाच्या घडून येणार आहेत. मंगळ पराक्रमात आणि शनीची मार्गी अवस्था. या दोन्ही ग्रहस्थिती तुमच्या प्रगतीचा वेग वाढविण्यास समर्थ ठरतील.

प्रामुख्याने दुसऱ्या पंधरवड्यात या साऱ्या महत्त्वाच्या गोष्टी घडून येणार असल्यामुळे दुसरा पंधरवडा सुरू होताच नव्या आशा अंकुरायला लागतील. प्रग-तीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील. आपल्या जीवनातील साऱ्या अनिष्टतेवर पडदा पडेल.

दि. ६ ते ९, १४ ते २०, २८ ते ३१ या वेळी अनेक संस्मरणीय गोष्टी घडाव्यात.

**कन्या :** आजवर शनी-मंगळांनी तुमची प्रगती रोखलेली होती. त्यांची राश्यंतरे घडून येताच या महिन्याच्या मध्यानंतर तुमचा मार्ग अनिर्बंध व निष्कंटक बनू लागेल.

तुमच्या राशीतील गुरूचे तुम्हांला या वेळी सतत सहकार्य लाभेल. अनेक गोष्टींत अपेक्षेबाहेर यश लाभेल. नव्या कल्पना स्फुरू लागतील. मनावरील नैराश्याची जळमटे झटकली जातील. अनेकांच्या सहकार्यामुळे नव्या व्यवसायक्षेत्रात पाऊल टाकण्याचे ठरेल. हा सर्वोत्तम कालच नव्हेच, पण पूर्वीपेक्षा लाख पटींनी बरा.

दि. ६ ते ९, १६ ते १९, २२ ते २७ अनुकूल दिवस.

**तूळ :** हा महिना आशावादी जाणवेल. गेल्या महिन्यातील सारी रेंगाळलेली कामे झटपट होऊ लागतील. विशेषतः, दुसऱ्या पंधरवड्यात.

कला–संशोधन–साहित्य ही तुमची खास क्षेत्रे; त्या क्षेत्रांत काही भव्यदिव्य करून दाखवण्याची तुमची योजना दि. १८ पासूनच आकार घेऊ लागेल.

विरोधक माघार घेतील, स्थित्यंतराची लक्षणे दिसू लागतील, राहत्या जागेचा प्रश्न लवकरच सुटण्याची चिन्हे दिसू लागतील. निर्धाराने पुढे पाऊल टाकलेत तर सहसा अपयश येऊ नये.

दि. ३ ते ९, ११ ते १९, २३ ते २८ अपेक्षेबाहेर लाभ देणारा काल.

**वृश्चिक :** तुमच्या प्रतिष्ठेची उंची वाढविणाऱ्या अनेक गोष्टी या महिन्यात घडून यायला लागतील.

शनी–मंगळ प्रतियोगाच्या आसपास (दि. १०) थोडेफार विरोधक निर्माण झाले तरी त्यांना ठोकरून काढणे फारसे अवघड जाणार नाही. दि. ११ च्या गुरू–हर्षल युतीपासून नव्या योजना आकार घेऊ लागतील, प्रगतीचे नवे मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील, धनिकांचे सहकार्य लाभल्यामुळे व्यवसाय अधिकच प्रगत बनू लागेल.

दि. १८ ला मंगळ बारावा येणार आहे म्हणून काळजी करू नका. गुरू एका-दशात असताना कोणत्याही ग्रहाची वक्रदृष्टी तुमच्याकडे वळणार नाही.

दि. ८ ते ११, १८ ते २३, २५ ते ३० आपल्या असफल आकांक्षा सफल होतील.

**धनू :** दि. २१ ला शनी मार्गी होताच तुमच्या मार्गातील अडथळे बऱ्याच प्रमा-णांत दूर व्हायला लागतील. शिवाय दि. १८ ला मंगळही एकादशात येणार आहे. सहसा कोणत्याही कार्यात फार मोठे यश जरी नाही मिळाले तरी अपेक्षित यश मिळायला मुळीच हरकत नाही.

आरोग्य सुधारेल, स्थावराची विवंचना मिटेल, विरोधकांची कारस्थाने त्यांच्याच अंगावर उलटतील. मनावरील नैराश्याची जळमटे या महिन्यात निश्चित झटकली जातील. वाहनाचा प्रश्न सुटेल, थोडाफार पैसाही हाती येईल.

दि. १ ते ५, ११ ते २१, २८ ते ३१ विशेष यशदायी काळ.

**मकर :** तुम्ही प्रगतीकडे वाटचाल करीत आहातच. या महिन्यात आणखी एक पाऊल पुढे पडेल. गुरू–हर्षल भाग्यात. एवढा एक योगही तुमचे महत्त्व आणि माहात्म्य वाढवण्यास समर्थ ठरेल.

यांत्रिक–संशोधन क्षेत्रात नवे क्षेत्र हस्तगत कराल. त्यात विक्रम करून दाखवण्याची संधी लाभेल. प्रगतीच्या क्षेत्रात भव्यदिव्य करून दाखवण्याची तुमची असफल आकांक्षा याच काळी सफल होईल. दि. ११ ची गुरू–हर्षल युती तुमच्या जीवनात अनंत प्रगत घटना घडवून आणील.

दि. ४ ते ७, ११ ते २०, २७ ते ३१ अत्युत्तम काळ.

**कुंभ :** आजवर आठव्या मंगळाने आणि वक्री शनीने तुम्हांला खूपच छळले. आता या महिन्यात त्या दोन्हीही अवस्था बदलणार आहेत. शिवाय सूर्य–बुध तुमच्या लाभस्थानी येणार आहेत.

दि. १८ पासून तुम्हांला नवा प्रकाश दिसू लागेल. नोकरीधंद्यातील हुकलेली संधी पुन्हा पदरी पडेल.

साहित्य–संशोधन क्षेत्रांत आजवर कधीही न मिळालेले यश या वेळी सहजासहजी लाभेल. दूरचा प्रवास घडेल, मंगल कार्यात भाग घ्याल, इष्टमित्रांचे साहाय्य लाभेल.

दि. ५ ते ९, ११ ते १७, २१ ते २७ अत्युत्तम काल.

**मीन :** तुम्हा मीनराशी व्यक्तींच्या बाबतींत याही महिन्यात काही विशेष चांगले असे मी लिहू शकत नाही. क्षमा करा. मंगळ सध्या सातवा आहे. दि. १८ ला तो आठवा होईल. त्याच व्यथा, त्याच विवंचना. थोडाफार फरक फक्त तपशिलात. नाही म्हणावयास सातवा गुरू-हर्षल तुमची बाजू प्राणपणाने लढवील.

मंगल कार्याचे ठरेल, नवे संपन्न भागीदार लाभतील. प्रगतीच्या वाटा दृष्टिक्षेपात येतील. पण सांपत्तिक अडचणी आणि अनारोग्य या बाबतींत आपणांस सतत सावधगिरी बाळगायला हवी.

दि. ४ ते ९, ११ ते १६, २३ ते २८ थोडेफार यश पदरी पडावे.

○

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd No. M H-649

लेनिनला नकोसा झालेला स्टॅलिन
स्टॅलिनच्या मूर्तिभंजनात धन्यता मानणारा ख्रुश्चेव्ह
ख्रुश्चेव्हला अज्ञातवासात ढकलणारे ब्रेझनेव्ह–कोसिजीन
प्रत्येकजण आपणच लेनिनचे सच्चे वारसदार आहोत
असे उच्चरवाने सांगत होते, सांगत आहेत.

लेनिनपंथाला लाभलेली ही दांडगी लोकप्रियता
लेनिनच्या अनन्यसाधारण कर्तृत्वाचाच पुरावा आहे.

अशा या लोकोत्तर पुरुषाच्या
जीवनकार्याचे समग्र दर्शन

व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे
मूल्य : रुपये आठरा
राजहंस प्रकाशन ४१९ नारायण पेठ, पुणे २.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., १७-बी, कोथरूड, पुणे ४, येथे छापून, ४१९. नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**,